दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२८२ | सोमवार दि.९ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### दीर्घकालीन राजकीय अधोगतीची नांदी ?

महाराष्ट्राच्या राजकारणात इतिहास पुन्हा पुन्हा घडतो, पण तो तसाच दिसत नाही हीच या राज्याची खरी ओळख आहे. २०१४ ते २०१९ या काळात राज्याने जे पाहिले, त्याच अस्थिरतेची, फुटीची, नव्या युतींची आणि सत्तेच्या आकडेमोडीची पुनरावृत्ती २०२६ मध्ये घडताना दिसत आहे. फरक इतकाच की यावेळी पक्ष वाढले आहेत, पण विरोधकांची ताकद वाढलेली नाही ; उलट सत्ताकेंद्र अधिक केंद्रीत झाले आहे.

# राज्यातील ३३ जिल्ह्यांत होणार रेशीम क्रांती

## ४.१८ लाखांच्या अनुदानासह 'महारेशीम अभियान

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी दिशा देणारे 'महारेशीम अभियान२०२६' सुरू होत असून, एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३२८ अंतर्गत रेशीम उद्योगाला थेट अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी आणण्याचा सरकारचा निर्धार स्पष्ट झाला आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या पुढाकारातून हे महत्त्वाकांक्षी अभियान राबविले जाणार आहे. जिल्हा परिषद निवडणूक नसलेल्या २१ जिल्ह्यांत ४





फेब्रुवारीपासून, तर आचारसंहिता संपल्यानंतर उर्वरित १२ जिल्ह्यांत १० फेब्रुवारीपासून हे अभियान सुरू होणार आहे. तुती लागवड व टसर रेशीम उत्पादनासाठी राज्यातील हवामान अत्यंत अनुकूल असल्याने या क्षेत्रात मोठी आर्थिक संधी निर्माण होणार आहे.

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणे आणि कृषीपूरक उद्योगांना चालना देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. २०१७ पासून राबविण्यात येणाऱ्या महारेशीम अभियानाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, हमखास व शाश्वत उत्पन्नामुळे रेशीम उद्योगाकडे पुन्हा एकदा आशेने पाहिले जात आहे.

सन २०२६ मध्ये तुती लागवड व टसर रेशीम लाभार्थ्यांची नोंदणी बीड, जालना, नांदेड, हिंगोली, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, भंडारा, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर व पालघर या २१ जिल्ह्यांत ४ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. उर्वरित जिल्ह्यांत १० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या कालावधीत नोंदणी प्रक्रिया राबविली जाणार आहे. 'मनरेगा'अंतर्गत तुती रोपे व मजुरीचा खर्च दिला जाणार आहे. तीन वर्षांत, तीन टप्प्यांत, मजुरी व साहित्यासाठी एकूण ४ लाख १८ हजार ८१५ रुपये अनुदान मिळणार असून, त्यामुळे रेशीम उद्योग शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा भरोसेमंद स्रोत ठरणार आहे.

# शिक्षक भरती घोटाळा! एसआयटी संशयाच्या भोवऱ्यात : चौकशी थंड

## कर्मचाऱ्यांना खुळे समजून वसुली सुरू असल्याची चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील नागपूर नाशिक पुणे आणि मराठवाड्यातील लातूर बीड परभणी या जिल्ह्यातील शिक्षण संस्था चालकांनी नियमबाह्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पैसे घेऊन नियुक्त केले याप्रकरणी राज्य शासनाने चौकशीसाठी स्थापन केलेल्या एसआयटी पथकालाच मॅनेज करण्यासाठी काही मॅनेजर रावांनी संस्थेतील कर्मचाऱ्यांना खुळे समजून पैसे उकळण्यास सुरुवात केली असल्याची चर्चा मराठवाड्यात सुरू आहे त्यामुळे एसआयटी चे पथकच संशयाच्या भोवऱ्यात असल्याचे दिसत आहेत.

राज्यातील काही संस्था चालकांनी आपल्या संस्थेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर भरती बंद असताना मागील तारखे मध्ये नियुक्त्या व मुलाखती दाखवून उमेदवाराकडून लाखो रुपये उकळत त्यांना नियुक्त्या दिल्या हा प्रकार सर्वप्रथम नागपूर विभागामध्ये उघडकीस आला नागपूर वेळामध्ये अनेक अधिकाऱ्यांना जेलची हवा खावी लागली याशिवाय ६ ०० नियुक्त केलेल्या शिक्षकांनाही यु डी आय क्रमांक नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली या प्रकरणाची शिक्षण संचालक शिक्षण मंत्री यांच्याकडे तक्रार करण्यात आल्यानंतर शासनाने ◀◀ पान २ वर

### तीन महिन्यात काय कारवाई

शिक्षक भरती घोटाळ्यामध्ये बीड जिल्ह्याचे देखील नाव असल्याने बीड जिल्ह्यातील या भरती घोटाळेची चौकशी एसआयटी करत आहे या एसआयटीमध्ये जालना जिल्ह्यातील शिक्षण विभागातील अधिकारी आहेत मात्र या साठी पथकाने बीडमध्ये अद्याप कोणतीच ठोस कारवाई केली नसल्याचे बोलले जात आहे जर शासनाला अहवाल दिला गेला असेल तर शासनाकडून देखील काय कारवाई करण्यात आली याबाबत सांगितले गेले नसल्याने चौकशीवर संशय व्यक्त केला जात आहे

# त्रिवेणी संगमावर अजितदादा पवार यांच्या अस्थींचे विसर्जन



**प्रयागराज । वृत्तसेवा**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या अस्थींचे आज उत्तरप्रदेशातील पावन प्रयागराज येथे गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर विधीवत विसर्जन करण्यात आले. अत्यंत साध्या पण भावपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या विधीवेळी पवार कुटुंबिय आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

अजितदादांच्या निधनानंतर राष्ट्रवादी परिवारातर्फे काश्मीर ते कन्याकुमारी अशी देशव्यापी 'अस्थि–कलश यात्रा' काढण्यात आली होती. हरिद्वार येथून सुरू झालेल्या या राष्ट्रव्यापी यात्रेची सांगता आज प्रयागराजमध्ये झाली. या यात्रेच्या ◀◀ पान २ वर

# परीक्षाकेंद्रावर 'मंगळसूत्र' उतरवलं

## हेच का हिंदुत्व अंबादास दानवे यांची सरकारवर टीका

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

आज राज्यभरात शिक्षक पात्रता परीक्षा पार पडत असताना छत्रपती संभाजीनगरमध्ये एका संतापजनक प्रकारामुळे मोठा गदारोळ पाहायला मिळाला. परीक्षा केंद्रात प्रवेशासाठी महिलांना चक्क त्यांचं 'सौभाग्याचं लेणं' म्हणजेच मंगळसूत्र काढून ठेवण्यास भाग पाडण्यात आलं. या घटनेचे तीव्र पडसाद उमटले असून विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शिंदे–फडणवीस–पवार सरकारवर बोचरी टीका केली आहे.

सकाळी ८ वाजेपासूनच शहरातील विविध केंद्रांवर परीक्षार्थींची गर्दी झाली होती. मात्र, आत जाताना मेटल डिटेक्टरचा बहाणा करत महिलांना मंगळसूत्र, कानातले आणि नाकातील दागिने काढण्याच्या सूचना देण्यात आल्या. अनेक विवाहित महिलांनी याला कडाडून विरोध केला. ''इतर दागिने ठीक आहेत, पण मंगळसूत्र का?'' असा सवाल विचारत महिला विद्यार्थी आक्रमक झाल्या. मात्र, केंद्राच्या ताठर भूमिकेमुळे अनेक महिलांना डोळ्यात पाणी आणून आपली मंगळसूत्रे नातेवाईकांच्या हवाली करावी लागली.

या प्रकाराची माहिती मिळताच अंबादास दानवे यांनी ट्विट करत सरकारचा खरपूस समाचार घेतला. दानवे म्हणाले की, ''स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेणाऱ्यांच्या राज्यात महिलांना मंगळसूत्र काढून परीक्षेला बसावे लागते, ◀◀ पान २ वर

# गुंडशाही कायद्याने ठोकून काढू! -मुख्यमंत्री

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राज्यात उद्योगांचे विकेंद्रीकरण वेगाने सुरू असताना औद्योगिक क्षेत्रातील झुंडशाही, गुंडशाही आणि उद्योजकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्ती अजिबात खपवून घेतल्या जाणार नाहीत. सुपा औद्योगिक क्षेत्रात उद्योजकांना त्रास देणारे काही वाईट उद्योग सुरू असल्याची माहिती मिळाली असून, अशा घटकांना कायद्याने ठोकून काढले जाईल, असा ठाम आणि स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. अहिल्यानगरपुणे महामार्गावरील



उद्योजक भरत गित्ते यांचे मुख्यमंत्र्यांकडून कौतूक

सुपा (ता. पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील खाजगी औद्योगिक प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार काशिनाथ दाते, आमदार बबनराव पाचपुते, हभप नामदेवशास्त्री, हभप महंत शिवाजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पारनेरसारख्या भागात नवे औद्योगिक इकोसिस्टिम उभे राहत असताना जसे चांगले लोक येतात, तसे काही वाईट लोकही तयार होतात. उद्योजकांना धमकावणे, अडथळे निर्माण करणे, खंडणीसारखे प्रकार करण्याचे प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वी अशा लोकांचा बंदोबस्त केला असून, ◀◀ पान २ वर

# तेलंगणात महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना

**संगारेड्डी/नाशिक । प्रतिनिधी**

तेलंगणामध्ये समाजकंटकांनी महात्मा जोतिबा पुले यांच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रयत्न केला. घटनास्थळी पोलिस असताना काही समाज कंटकांनी हा प्रकार केला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला आणि कार्यकर्त्यांना पिटाळून लावले. पण या घटनेमुळे देशभरात संतापाची लाट उसळली आहे. संगारेड्डी जिल्ह्यात ही घटना घडली. समाजकंटकांना अटक करण्याची आणि कठोर शासन करण्याची मागणी होत आहे.

### देशासह महाराष्ट्रातही संतापाची लाट पोलिसांचा वेळीच हस्तक्षेप

संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्लापूर या गावातील ही घटना आहे. समाजकंटकांमुळे इथं बराच काळ तणाव दिसून आली. कायदा सुव्यवस्था बिघडली. समाजकंटकांनी महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा विद्रुप करण्याचा आणि तो हलवण्याचा प्रयत्न केला. समाजकंटकांच्या या कृतीमुळे काही काळ तणाव निर्माण झाला. आंदोलनांतील काही ◀◀ पान २ वर

# णमोकार तीर्थावरमुख्यमंत्री व प्रफुल पटेलांची एकत्रित उपस्थिती

**नाशिक । प्रतिनिधी**

मालसाणे येथे सुरू असलेल्या जैन धर्मियांच्या पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवाच्या ठिकाणी शनिवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली. त्यांच्यासोबत यावेळी राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांचीही उपस्थिती होती. मुख्यमंत्र्यांनी यावेळी जैन मुनींचे दर्शन आणि आशीर्वाद घेतले. त्याचसोबत यावेळी मुख्यमंत्र्यांनी जैन मुनींचे मार्गदर्शनही घेतलं.

नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथील मालसाणे या ठिकाणी पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवाचा दुसरा दिवस आहे. त्यानिमित्ताने भक्तांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दिसून येत आहे. त्याचवेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल पटेल यांनी त्यांचे दर्शन घेतलं. यावेळी जैन मुनींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रफुल पटेलांना आशीर्वाद ◀◀ पान २ वर

# राज्यभरात लालपरीची चाके थांबणार ?

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भत्ता प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने कर्मचा–यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. याबाबत आता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचा–यांच्या मासिक भत्त्याबाबत राज्य सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही, तर एसटी बंद करण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्यभरात पुन्हा एकदा एसटी बंद करण्याचा इशारा कर्मचारी संघटनांनी दिला आहे.




केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार राज्य सरकारच्या अर्थ विभागाने ११ डिसेंबर १९९८ रोजी एसटी महामंडळातील आगारांची शहरनिहाय अ १, अ, ब १, ब २ अशी वर्गवारी केली. त्यानुसार एसटी महामंडळाच्या कर्मचा–यांना शहराच्या श्रेणी आणि वर्गनिहाय मासिक वेतनानुसार मासिक पूरक भत्ता ठरवून दिला आहे. मात्र, अनेक शहरांतील कर्मचा–यांना नियमाप्रमाणे मासिक भत्ता दिला जात नसून, याबाबत वारंवार मागणी करण्यात आल्यानंतरही याबाबत योग्य निर्णय न घेतल्यास राज्यात एसटी बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य एसटी कामगार संघटनेचे सचिव दिलीप परब यांनी दिला आहे.दरम्यान, एसटी कर्मचा–यांच्या संघटनेकडून त्यासाठी सरकारला ३ दिवसांचा वेळ दिला आहे. यावर राज्य सरकारकडून ◀◀ पान २ वर

# शिक्षणात 'एआय' अभ्यासासाठी 'यूपीआय'सारखे व्यासपीठ

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

एआयमुळे देशाच्या शिक्षण व्यवस्थेत मोठे बदल होणार आहेत. अभ्यासासाठी यूपीआयसारखे राष्ट्रीय डिजिटल प्लॅटफॉर्म तयार केले जात आहे. यामुळे शाळा–महाविद्यालयीन कोणत्याही विषयाचा कोणताही टॉपिक मोबाइलवर ऑडिओ आणि व्हीडीओमध्ये उपलब्ध होईल. विद्यार्थी त्यांच्या आवडीच्या भाषेत आणि शिक्षकांच्या आवाजात व्याख्याने ऐकू शकतील. हे प्लॅटफॉर्म 'भारत बोधन एआय स्टॅक' या नावाने विकसित केले जात आहे.

ज्याप्रमाणे भीम, गुगलपे, पेटीएम आणि फोनपे यांसारखे ॲप्स यूपीआयवर काम करतात, त्याचप्रमाणे शिक्षणाशी संबंधित मोबाइल ॲप्स 'भारत बोधन' एआय स्टॅकवर



काम करतील. हे प्लॅटफॉर्म पूर्णपणे कस्टमाइज्ड असेल. विद्यार्थी जसा प्रश्न विचारेल, त्यानुसार लेक्चर तयार होईल. विद्यार्थी ऑडिओ किंवा व्हीडीओचा पर्याय ◀◀ पान २ वर

### एआय फाउंडेशनची स्थापना

शिक्षण मंत्रालयाने आयआयटी मद्रासमध्ये शिक्षणातील एआयसाठी सेंटर फॉर एक्सलन्सची स्थापना केली आहे. याला 'आयआयटी मद्रास बोधन एआय फाउंडेशन' असे नाव देण्यात आले आहे. या केंद्राला भारत बोधन एआय स्टॅक अंतर्गत स्केलेबल एआय सोल्युशन्स विकसित करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. एनसीईआरटी आणि राज्य मंडळांच्या पाठ्यपुस्तकांना एआय रिपॉझिटरीचा भाग बनवले जाईल. हे दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# मतदानानंतर ईव्हीएम मशीन मिळाल्या ढाब्यावर

**सोलापूर । प्रतिनिधी**

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितींसाठी निवडणूक पार पडली. ७ जानेवारी रोजी मतदान झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यात एका ढाब्यावर ३ ईव्हीएम मशीन आढळून आल्याने खळबळ उडाली. हा प्रकार समोर आल्यानंतर निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्न उपस्थित केले जात आहेत. उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनीही तीन ईव्हीएम मशीन आढळून आल्याच्या प्रकाराला दुजोरा दिला आहे. या मशीन मतदानासाठी वापरल्या गेलेल्या नाहीत असे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ मतदारसंघात हा प्रकार घडला आहे. मोहोळ शहराजवळ असलेल्या एका ढाब्यावर ईव्हीएम मशीन आढळून आल्या. राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) पक्षाचे नेते ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### भारत फ्रान्सकडून करणार राफेलची खरेदी

नवी दिल्ली : शत्रुराष्ट्रांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी भारत मोठया प्रमाणावर शस्त्र आणि दारूगोळा खरेदी करण्याची तयारी करीत असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संरक्षण अधिग्रहण परिषद (डीएसी) लष्करासाठी शंभरपेक्षा जास्त राफेल लढाऊ विमाने, पी–८ आय मरिटाइम पॅट्रोल आणि अंटी सबमरिन वारफेअर एअरक्राफ्ट तसेच मरिन गॅस टर्बाईन इंजिनसह विविध साहित्य खरेदी करण्याची तयारीत आहे.अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात संरक्षण मंत्रालयासाठी ७ लाख ८४ हजार ६७८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

### ८ व्या वेतन आयोगाची वेबसाईट लाईव्ह

नवी दिल्ली : देशातील लाखो केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. ८ व्या वेतन आयोगाने आपली अधिकृत वेबसाईट ८.. लॉंच केली असून नवीन वेतन संरचनेबाबत विविध घटकांकडून मते मागवण्यास सुरुवात केली आहे.८ व्या वेतन आयोगाने प्रक्रियेत पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता आणण्यासाठी माय .इन पोर्टलवर एक प्रश्नावली प्रसिद्ध केली आहे. यामध्ये एकूण १८ प्रश्न विचारण्यात आले आहेत. या प्रश्नांच्या माध्यमातून वेतन वाढ, महागाई भत्ता, फिटमेंट फॅक्टर आणि पेन्शनमधील सुधारणांबाबत संबंधितांकडून इनपुट्स मागवण्यात आले आहेत.

### भारतात दरवर्षी २०० नेपाळी किडन्या

नवी दिल्ली : होक्षे हे गाव नेपाळची राजधानी काठमांडूपासून ४० किमीवर, पंचखाल पोलिस स्टेशनपासून फक्त ३ किमी अंतरावर लष्करी छावणीला लागून आहे. संपूर्ण नेपाळमध्ये ते किडनी व्हिलेज म्हणून ओळखले जाते. कारण येथील १०० हून अधिक तरुणांनी भारतात त्यांच्या किडन्या विकल्या आहेत. नेपाळी पोलिसांनी रॅकेटच्या मुख्य सूत्रधारांना तुरुंगात टाकले आहे. आता भारतीय तस्कर ते चालवत आहेत. ते त्यांच्या एजंट्सद्वारे येथे थेट पीडितांना शोधतात आणि त्यांना नवी दिल्ली, हैदराबाद, चेन्नई आणि कोलकाता येथे आणतात, जिथे ते त्यांची किडनी ४ ते ५ लाख रुपयांना विकतात.

### आंतरराष्ट्रीय तेल तस्करीचे रॅकेट उद्ध्वस्त

नवी दिल्ली : मुंबईच्या किना–यापासून सुमारे १०० सागरी मैल अंतरावर समुद्रात केलेल्या कारवाईत तीन जहाजे जप्त करून आंतरराष्ट्रीय तेल तस्करीचे रॅकेट उद्ध्वस्त केल्याची माहिती भारतीय तटरक्षक दलाने (कोस्टगार्ड) दिली. या तीनही जहाजांवर तटरक्षक दलाने पाळत ठेवली होती. ५ फेब्रुवारी रोजी मुंबईच्या पश्चिमेला १०० सागरी मैल अंतरावर तटरक्षकाने तीन जहाजांना अडविले. या जहाजांच्या कागदपत्रांची तपासणी आणि कर्मचा–यांची चौकशी केल्यानंतर तेलतस्करीचा हा मामला उघडकीस आला.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.७ फेब्रुवारी २०२६
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९.५० क्विंटल | २,३०० | २,९११ | २,५७० |
| ज्वारी/हायब्रिड: २८.५० क्विंटल | २,४५१ | ४,०५६ | ३,३२२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ५४.०० क्विंटल | ७,४०१ | ८,१०० | ७,८८२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: ९.०० क्विंटल | २,४३१ | २,९५० | २,७९० |
| मुग: २.०० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: २१.५० क्विंटल | ५,६०० | ५,६०० | ५,६०० |
| हरभरा:०.५० क्विंटल | ५,३०० | ५,३०० | ५,३०० |

अग्रलेख

# दीर्घकालीन राजकीय अधोगतीची नांदी ?

महाराष्ट्राच्या राजकारणात इतिहास पुन्हा पुन्हा घडतो, पण तो तसाच दिसत नाही हीच या राज्याची खरी ओळख आहे. २०१४ ते २०१९ या काळात राज्याने जे पाहिले, त्याच अस्थिरतेची, फुटीची, नव्या युतींची आणि सत्तेच्या आकडेमोडीची पुनरावृत्ती २०२६ मध्ये घडताना दिसत आहे. फरक इतकाच की यावेळी पक्ष वाढले आहेत, पण विरोधकांची ताकद वाढलेली नाही; उलट सत्ताकेंद्र अधिक केंद्रीत झाले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूने केवळ एका नेत्याचा अंत झाला नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एक निर्णायक 'किंगमेकर' हरपला. त्यांच्या अनुपस्थितीने निर्माण झालेली पोकळी, त्यावरून उठलेले संशय, चौकशीची मागणी आणि त्यानंतर झालेले राजकीय पुनर्संयोजन या साऱ्यामुळे राज्य पुन्हा एकदा चक्रव्यूहात अडकले आहे.

२०१४ नंतर भाजपने महाराष्ट्रात हळूहळू पण ठामपणे सत्ता रुजवली. २०२६ च्या महापालिका निकालांनी हे पुन्हा अधोरेखित झाले. भाजप आणि महायुतीने शहरी भागात मिळवलेले वर्चस्व हे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांचे यश नाही, तर आगामी विधानसभा आणि लोकसभा राजकारणाचा संकेत आहे. २०१४ मधील 'मोदी लाटे'नंतर जसे विरोधक गोंधळले होते, तशीच अवस्था आज पुन्हा दिसते.

आज मतदारांसमोर भाजपचे तीन अवतार आहेत. मूळ भाजप, शिंदे गटाची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी. हे तीनही घटक सत्तेच्या बाजूने असले, तरी त्यांच्यातील अंतर्गत स्पर्धा आणि मतांचे विभाजन हा भविष्यात भाजपसमोरील खरा पेच ठरू शकतो. मात्र सध्या तरी या 'तीन अवतारां'चा फायदा भाजपलाच होताना दिसतो.

विरोधकांची दुर्दशा : आत्मपरीक्षणाची वेळ

काँग्रेस, ठाकरे गटाची शिवसेना, मनसे आणि शरद पवारांची राष्ट्रवादी हे चारही घटक आज अस्तित्वाच्या लढाईत अडकले आहेत. २०१४–१९ मध्ये युती, फूट आणि सत्तेच्या खेळात हे पक्ष भरडले गेले; २०२६ मध्येही त्याच चुका पुन्हा होताना दिसतात. ठोस नेतृत्वाचा अभाव, एकत्रित धोरणाचा अभाव आणि जनतेशी तुटलेला संवाद यामुळे हे पक्ष सत्तेच्या केंद्रापासून दूर गेले आहेत.

मनसेचा प्रभाव मर्यादित झाला आहे, शिवसेना (ठाकरे) अजूनही फुटीच्या धक्क्यातून सावरलेली नाही, काँग्रेस ग्रामीण व शहरी दोन्ही पातळ्यांवर पिछाडीवर आहे, तर शरद पवार गट नेतृत्व असूनही संघटनात्मक ताकदीअभावी अडचणीत आहे. पुढील साडेतीन वर्षे हे पक्ष केवळ तग धरतात की नव्याने उभे राहतात, यावरच त्यांचे भवितव्य ठरणार आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवारांनी घेतलेली भूमिका ही केवळ भावनिक नव्हे, तर राजकीयदृष्ट्या महत्त्वाची आहे. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी इतिहास रचला असला, तरी त्यांच्यासमोरचे आव्हान मोठे आहे ते म्हणजे अजित पवारांनी सांभाळलेली सत्ता, संघटन आणि विश्वास टिकवणे. घराणेशाहीचा आरोप, भाजपशी जवळीक आणि शरद पवार गटाशी तुटलेले संवाद या साऱ्यांमध्ये संतुलन साधावे लागणार आहे.

२०२६ मध्ये महाराष्ट्र पुन्हा एकदा २०१४–१९ सारख्या वळणावर उभा आहे. भाजप मजबूत आहे, पण अजेय नाही. विरोधक दुर्बळ आहेत, पण संपलेले नाहीत. प्रश्न इतकाच आहे. हे पक्ष आत्मपरीक्षण करून नव्याने उभे राहणार की पुन्हा सत्तेच्या खेळात मोहरे बनणार? महाराष्ट्राच्या राजकारणाचा इतिहास सांगतो की इथे सत्ता कायमची कुणाकडे राहत नाही. मात्र सध्याचे चित्र पाहता, पुढील साडेतीन वर्षे विरोधकांनी केवळ वाट पाहिली, तर २०२६ हा केवळ २०१४–१९ ची पुनरावृत्ती न राहता, एका दीर्घकालीन राजकीय अधोगतीची नांदी ठरू शकतो. आणि तेच महाराष्ट्रासाठी सर्वात मोठे संकट असेल.

# ना.पंकजाताईंचे माध्यमातुन परळी येथे होणारा महा पशुधन एक्सपो जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे -नवनाथ शिराळे

बीड । प्रतिनिधी

महापशुधन एक्स्पो मेळावा म्हणजेच बीडच्या शेतकऱ्यासाठी दुग्ध मिश्रित असा शर्करा योग आहे असे म्हटलं तर हरकत नाही म्हणून बीडच्या शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी व नव एक चैतन्य शक्ती आहे महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे दि. १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत महापशुधन एक्स्पो मेळावा घेऊन बीड जिल्ह्यातील



शेतकऱ्यांना व पशुपालकांना आर्थिक विकासासाठी नवसंजीवनी निर्माण करुन दिली आहे शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे

बीड जिल्ह्यातील परळी येथे दि. १३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी यादरम्यान पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या विभागाद्वारे महापशुधन एक्स्पो हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी सशक्त पशुधन बीड जिल्ह्यातील व राज्यातील शेतकरी पशुपालकांना नवनवीन पशुधनाची व त्यांच्या निगराणीविषयी तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी या करिता हे महापशुधन एक्स्पोचे आयोजन केले आहे या प्रदर्शनात १५०० विविध प्रकारची उत्कृष्ट माहिती देण्यात येणार आहे त्यामुळे या कार्यक्रमासाठी बीड जिल्ह्यातील तमाम शेतकरी बांधवांनी व बीड जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे.

# राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता कंत्राटी कर्मचारी धडकणार मुंबईत

जालना । प्रतिनिधी

राज्यातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना मागील सुमारे पाच महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांची दिवाळी अंधारात गेली असून, कर्मचाऱ्यांचा संयम संपलेला आहे.

न्यायालयाने दहा वर्षे पूर्ण केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करण्याचा निर्णय दिला असतानाही शासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या पार्श्वभूमीवर दिनांक ४ फेब्रुवारीपासून कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले असून, ४ ते ६ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरावर आंदोलन करण्यात आले.

## संपूर्ण मागण्या मान्य होईपर्यंत माघार नाही

दिनांक ९ फेब्रुवारीपासून राज्यातील सुमारे ८०० कर्मचारी मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलनासाठी धडक देणार आहेत. शासनाने व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे मनधरणी करण्याचा प्रयत्न केला, मात्र कोणतीही मागणी मान्य न केल्याने आंदोलन सुरूच राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड यांनी दिली. प्रलंबित मानधन तात्काळ जमा करणे, पुढील मानधनाबाबत लेखी तरतूद जाहीर करणे तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायम करणे या प्रमुख मागण्या असून, त्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्यस्तरावरील बाह्य स्त्रोत यंत्रणेमार्फत कार्यरत कर्मचाऱ्यांचे मानधन नियमित दिले जाते, तसेच प्रतिनियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मानधनही नियमित आहे. जिल्हास्तरावर २०–२० वर्षे सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानधन का दिले जात नाही? न्यायालयाच्या आदेशानुसार बाह्य स्त्रोत यंत्रणेमार्फत भरती करू नये, असे असतानाही भरती केली जात असून जल जीवन मिशनमधील मानधन न मिळण्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रमाकांत गायकवाड यांनी केली आहे.

## पान ६ वरून...

### विवाह सोहळ्यात अनोखा

आनंदाच्या क्षणी सामाजिक जाणिवेचा संदेश देत संविधानाचे महत्त्व अधोरेखित करणारा हा उपक्रम उपस्थितांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरला. नव्या पिढीला संविधानातील मूल्यांची जाणीव करून देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना अनेक मान्यवरांनी व्यक्त केली.

### माता रमाई यांच्या

त्यांच्या त्याग, संयम आणि समर्पणाची प्रेरणादायी उदाहरणे विद्यार्थ्यांसमोर मांडली. महापुरुषांचे विचार प्रत्येकाच्या मनामध्ये रुजले पाहिजेत आणि त्यांच्या कार्याचा आदर्श आपल्या जीवनात उतरवला पाहिजे. आपण त्यांच्या पायाची धूळ होण्याइतके जरी त्यांचे विचार आत्मसात केले तरी जीवन समृद्ध होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की, जगण्याला एक ठोस तत्व असले पाहिजे. केवळ जन्माला आलो म्हणून जगणे हे खरे जीवन नसून, आव्हानांचा सामना करत जगण्यातच खरी मजा आहे. महापुरुषांनी आपल्या जीवनात प्रत्येक पावलावर संघर्ष केला आणि म्हणूनच त्यांची आठवण शतकानुशतके जिवंत आहे. चांगले कार्य करणारी माणसे कधीच मरत नाहीत; त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांचे विचार समाजाला दिशा देत राहतात. आपण वास्तववादी जीवन जगले पाहिजे, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे संविधानवादी विचारसरणी जोपासणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी स्त्री–पुरुष समानतेचे महत्त्व अधोरेखित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'थॉट्स ऑन पाकिस्तान' या ग्रंथामधून माता रमाईंच्या त्यागाचा गौरव केला असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन कुटुंब आणि समाजात समानतेचा विचार आचरणात आणण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्राचार्य डी.डी.राऊत यांनी मानले. कार्यक्रमास संस्थेच्या विविध युनिटमधील पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत

मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरले.

या उल्लेखनीय यशाबद्दल आनंद चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष मा. आ. भीमराव धोंडे, संचालक डॉ. अजय धोंडे, तसेच प्रशासकीय अधिकारी सर्वश्री डॉ. डी. बी. राऊत, एस. जी. विधाते, डी. झेड. बोडखे, सागर वाघुले, संदीप नन्नवरे डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) महाविद्यालय आष्टीचे प्राचार्य प्रा. संजय बोडखे यांनी संघाचे अभिनंदन केले.

यावेळी संस्थेअंतर्गत महाविद्यालयांचे प्राचार्य छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरसूल श्रीराम, महेश आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत गोसावी, महेश अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रागीट सतीशचंद्र, अन्न तंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. साईनाथ मोहळकर आणि फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनीही संघाच्या कामगिरीचे कौतुक करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सलग तीन वर्षांच्या या हॅटट्रिक विजयानिमित्त आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) आष्टीच्या क्रीडा परंपरेला अधिक बळ मिळाले असून, आगामी राज्यस्तरीय स्पर्धेतही संघ भरीव यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

### थकीत देयके निकाली

त्यामुळे शासनाने महाराष्ट्रातील वेतन पथक कार्यालयाला बिल चेक करण्यासाठी जास्त (वेळ) कालावधी द्यावा जेणेकरून सर्व कर्मचाऱ्यांचे बिल व्यवस्थित चेक करून पुढे पाठवले जाईल, सर्व थकीत देयके शासनाने याच वर्षात निकाली काढावे. त्या साठी लागणारा पुरेसा निधी उपलब्ध करून देत या वर्षात या हेडचे संपूर्ण थकीत देयके निकाली काढावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली आहे.

### खंडोबा दिपमाळ मंदिरातील

निर्माण झाले होते. या ऐतिहासिक दिपमाळेच्या संवर्धनासाठी देवस्थान विश्वस्त मंडळाने सातत्याने पुरातत्व विभाग व जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. त्या पाठपुराव्याला यश येत आता पुरातत्व खात्यामार्फत शास्त्रीय पद्धतीने दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. सध्या दिपमाळेभोवती बांबूचे स्कॅफोल्डिंग उभारण्यात आले असून दगडी भागाची तपासणी व प्राथमिक संवर्धनाची प्रक्रिया सुरू आहे.

बीड शहराला समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. शहरात पाऊलोपाऊली इतिहासाच्या खुणा आढळून येतात. मात्र शहरातील अनेक ऐतिहासिक वास्तू पुरातत्व खात्याच्या अखत्यारित येत असल्याने त्या विकास व नियमित देखभालीपासून वंचित राहिल्या आहेत. यामुळे अनेक मौल्यवान वास्तू हळूहळू जीर्ण होत नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. बीड शहराचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपायचा असेल, तर अशा वास्तूंचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन व संरक्षण होणे ही काळाची गरज असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

याबाबत बोलताना देवस्थानचे विश्वस्त रामनाथ खोड यांनी सांगितले की, ''बीड शहराला समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे आणि येथे पाऊलोपाऊली इतिहासाच्या खुणा आढळून येतात. हा वारसा जपणे ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक बीडकराची सामूहिक जबाबदारी आहे. अशा ऐतिहासिक वास्तू आपल्या शहराची ओळख देश–विदेशात करून देतात. मात्र या वास्तूंकडे दुर्लक्ष करून आपणच आपल्या शहराची ऐतिहासिक ओळख हळूहळू पुसण्याचे काम करत आहोत. वेळेत संवर्धन केले नाही, तर पुढील पिढ्यांना हा इतिहास फक्त पुस्तकांतूनच पाहावा लागेल. त्यामुळे प्रशासनासह नागरिकांनीही या संवर्धनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.''

दिपमाळेच्या दुरुस्तीचे काम अंदाजे एक महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असून कामाच्या प्रत्येक टप्प्यावर पुरातत्व विभागाचे तांत्रिक मार्गदर्शन घेतले जात आहे. मंदिराच्या ऐतिहासिक, धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वाचा विचार करता दुरुस्तीच्या कामात कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे देवस्थान ट्रस्टींकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर दिपमाळेची मजबुती व सुरक्षितता वाढणार असून तिचे ऐतिहासिक सौंदर्य पुन्हा उजळून निघेल. या कामामुळे श्री खंडोबा मंदिराच्या ऐतिहासिक वैभवात मोलाची भर पडणार असल्याची अपेक्षा भाविक व नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### गुरू–शिष्य परंपरेतूनच

हनुमंतासारखी पारदर्शक असावी. श्रीराम व हनुमान यांचे संदर्भ उदाहरण देवून सुश्री अन्नपूर्णा भारतीजी पुढे म्हणाल्या की, गुरू हा बुद्धीचा राजा असून गुरू व शिष्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. जीवन जगत असतांना आपणास अनेक अडचणी येत असतात. परंतू या अडचणीतूनही सदाचाराचा मार्ग दाखविण्याचे काम आपले गुरू नकळतपणे करीत असतात त्याकरीता गुरूवर विश्वास असणे अत्यंत आवश्यक असून अनेकदा गुरू शिष्याची परिक्षा घेतो तेंव्हा शिष्याने त्या प्रसंगाला तन्मयतेने तोंड दिले पाहिजे असे सुश्री अन्नपूर्णा भारतीजी म्हणाल्या.

या कार्यक्रमात बोलतांना आशुतोषजी महाराज यांचे कृपापात्र शिष्य स्वामी निरूपानंदजी यांनी आपल्या सत्संग विचारातून आदी गुरु शंकराचार्यांच्या गुरु अष्टकम ची व्याख्या केली स्वामी विवेकानंद जी जेव्हा ईश्वराच्या शोधामध्ये निघाले होते तेव्हा त्यांच्या जीवनामध्ये राम कृष्ण परमहंस जी भेटले तेव्हा विवेकानंदजींनी राम कृष्ण परमहंसजींना विचारले ईश्वर आहे का राम कृष्ण परमहंसजींनी म्हणाले हो आहे दुसरा प्रश्न केला तुम्ही पाहिले का व मला दाखवू शकते का? तेव्हा या तिन्ही प्रश्नाचे उत्तर भेटले हो ईश्वर आहे मी बघितले आहे व तुम्हाला पण दाखवू दाखवू शकतो असे आम्हाला पण असे गुरुचरणी जायला पाहिजे असे स्वामीजींनी सांगितले . सध्याचे जीवन अत्यंत खडतर असून स्पर्धेच्या युगात मानव नाहकपणे भरकटत आहे. अशावेळी गुरू त्यांना योग्य मार्ग दाखवून कल्याणाचा महामंत्र देतो असे त्या म्हणाल्या. दरम्यान सर्वश्री आशुतोषजी महाराज हे आम्हा सर्वांचे गुरू असून त्यांनी दिलेली शिकवण आमच्या जीवनाचे सार्थक करण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास स्वामी निरूपानंदजी यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी गुरूचरणी विविध भजने सादर करण्यात आली. टाळ तसेच संगीताच्या स्वरध्वनीवर अध्यात्मिक प्रवचन व भजनात भाविक भक्त अक्षरश: मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व आरती करण्यात आली. वकार्यक्रमा ला संत धुराबाई उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित साधक व भक्त टाळ्यांच्या गजरामध्ये भजनात सहभागी झाले होते. कार्यक्रमास भाविकांची मोठी गर्दी या सत्संग सोहळयास लाभली होती.

## पान १ वरून...

### शिक्षक भरती घोटाळा!

राज्यातील शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी एसआयटी समिती स्थापन केली विशेषता ही समिती जिल्ह्यातील असून जिल्ह्याबाहेरील समिती आहे या समितीमध्ये शिक्षण अधिकारी उपशिक्षणाधिकारी आणि अधीक्षक यांची नेमणूक करण्यात आली प्रामुख्याने या शिक्षकांच्या नियुक्ती आणि वेतन च्या विभागातूनच केले जाते त्याच विभागातील एक एक कर्मचारी या एसआयटी मध्ये नियुक्त करण्यात आला बीड जिल्ह्यामध्ये देखील हा प्रकार मोठ्या प्रमाणात घडला असल्याच्या तक्रारी आहेत लातूर येथील मधुकर कुलकर्णी यांनी थेट चारिटी कमिशनर आणि शिक्षण विभाग यांना सविस्तर तक्रार देऊन संस्थांमध्ये किती शिक्षकांची मोकस भरती करण्यात आली याची लिस्ट दिली. ज्या काळामध्ये बंदी होती त्या काळात केवळ ३८ शिक्षक असताना २०२५ २६ पर्यंत ही संख्या शंभरावर गेली कशी त्याला मान्यता दिली कुणी त्यामुळे हा संशय अधिकच बळावला असून मोठ्या प्रमाणात बोगस भरती करण्यात आली हे यातून दिसून येते विशेष म्हणजे संस्थाचालकांनी शिक्षकाला खुळे समजून चक्क एस आय टी लाच मॅनेज करण्यासाठी कर्मचाऱ्याकडून लाखो रुपये गोळा करण्याचा नवीन फंडा सुरू केला असल्याची चर्चा आहे विशेष म्हणजे या संदर्भात एक व्हिडिओ देखील समाज माध्यमावर व्हायरल होत असून त्यामध्ये तर स्पष्ट लाखो रुपये घेतले जात असल्याचे बोलले जात आहेत यामध्ये मराठवाड्यातील काही नामवंत संस्थांचाही सहभाग असून या सर्वांची जबाबदारी मराठवाड्यातीलच एका नामांकित संस्थेच्या व्यक्तीने घेतली असल्याचे समजले जाते मात्र त्या व्यक्तीने कर्मचाऱ्यांनाच खुळे समजून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्याकडून प्रत्येकी दर ठरवला आहे गेल्या तीन महिन्यापूर्वी स्थापन झालेल्या यासाठी अद्याप कसलीच चौकशी किंवा कारवाई केली नसल्याने किंवा ती केल्याचे दिसत नसल्याने यासाठीच संशयाच्या भवऱ्यात आहे असे शिक्षण क्षेत्रामधून बोलले जात आहे.

### गुंडशाही कायद्याने

आता पुन्हा कोणी हिम्मत केली तर त्याला स्पेअर केले जाणार नाही.मुख्यमंत्री म्हणाले की, पुढील पाच वर्षे औद्योगिक विजेचे दर वाढणार नाहीत; उलट ते कसे कमी होतील यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. लॉजिस्टिक्स खर्च कमी करण्यावरही भर दिला जात आहे. नागरिकांना उद्योगांकडून त्रास होत असल्यास त्यांनी अधिकृत नियामक यंत्रणेकडे दाद मागावी, असे आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले की, अनैतिक प्रथा असतील तर रेग्युलेटर कारवाई करेल; पण झुंडशाही, दादागिरी आणि गुंडगिरी महाराष्ट्रातील कोणत्याही एमआयडीसीत खपवून घेतली जाणार नाही. जोपर्यंत भरतसारखे प्रामाणिक उद्योजक आमच्यासोबत आहेत, तोपर्यंत महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती कोणीही थांबवू शकणार नाही, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तौरल इंडियाचे संस्थापक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गित्ते यांनी सुरू केलेल्या पारनेर, अहिल्यानगर येथील प्लॅन्टचे उद्घाटन करण्यात आले. भरत गित्ते हे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर आहेत. यावेळी ॲल्युमिनियम मॅन पुतळ्याचे अनावरण देखील करण्यात आले. गित्ते यांच्या उद्योगक्षेत्रातील कार्याचे मुख्यमंत्र्यांनी तोंड भरून कौतूक केले.

### त्रिवेणी संगमावर

माध्यमातून देशाच्या विविध भागांतील नागरिकांनी लाडक्या नेत्याला आदरांजली वाहिली. अजितदादांचे चिरंजीव, युवानेते जय पवार यांनी याप्रसंगी उपस्थित राहून पुत्राचे कर्तव्य पार पाडले. त्रिवेणी संगमाच्या व्हीआयपी घाटावर पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली अस्थि–कलशाचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर अत्यंत भावूक वातावरणात जय पवार यांनी पवित्र अस्थी संगमाच्या प्रवाहामध्ये अर्पण केल्या. आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देताना उपस्थित कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले होते. हा सोहळा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष

धीरज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. यावेळी राष्ट्रीय सचिव धनंजय शर्मा, उत्तरप्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हरिश्चंद्र सिंग, तसेच उत्तरप्रदेशातील भाजपचे काही प्रमुख नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

### परीक्षाकेंद्रावर 'मंगळसूत्र'

हे दुर्दैवी आहे. इतर दागिने समजू शकतो, पण मंगळसूत्र हे फक्त शोभेचं साधन नाही तर ते सौभाग्याचं प्रतीक आहे. सरकारने ही जाचक नियमावली तात्काळ बदलली पाहिजे. ''हे सरकार केवळ नावापुरतं हिंदुत्ववादी आहे का? सौभाग्याचं प्रतीक असलेलं मंगळसूत्र उतरवायला लावणं ही संस्कृती नाही. परीक्षा पारदर्शक व्हावी ही आमचीही इच्छा आहे, पण त्यासाठी हिंदू संस्कृतीतील प्रतीकांचा अपमान खपवून घेतला जाणार नाही.असे दानवे म्हणाले.

### राज्यभरात लालपरीची

काय निर्णय घेतला जाणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. अन्यथा एसटी बंद राहिल्यास प्रवाशांचे हाल होण्याची शक्यता आहे.मागण्या मान्य न झाल्यास एसटी बंद करण्याचा इशारा कर्मचारी संघटनेने दिला आहे. एसटी कर्मचा–यांच्या संघटनेकडून त्यासाठी सरकारला ३ दिवसांचा वेळ दिला आहे. राज्यभरातील एसटी कर्मचारी संघटनांनी संप पुकारल्यास 'महाराष्ट्र बंद'सारखी स्थिती होऊ शकते. राज्य सरकारकडून यावर काय निर्णय घेतला जाणार,याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

### तेलंगणात महात्मा

जणांनी आणि पोलिसांनी त्यांना वेळीच रोखले. ही घटना वा–यासारखी पसरल्यानंतर लोकांनी या ठिकाणी मोठी गर्दी केली. यावेळी समाजकंटकांचा निषेध करण्यात आला.या घटनेवर वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी संताप व्यक्त केला. त्यांनी सोशल मीडिया अकाऊंटवर पोस्ट केली आहे. या घटनेमागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा हात असल्याचा आरोप त्यांनी केला. हा केवळ महात्मा जोतिबा फुले यांच्यावर झालेला हल्ला नसून दलित, आदिवासी आणि ओबीसी समाजावर झालेला हल्ला आहे. संघाला महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा तिरस्कार वाटतो. संघाचं केवळ मनुवाद आणि ब्राह्मणवादावर प्रेम आहे. हा हल्ला वंचितांच्या आणि बहुजनांच्या समतेच्या चळवळीवरील आघात आहे, असा प्रहार त्यांनी केला. त्यांनी मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांना तेलंगणात अशा घटना वारंवार घडत असताना तुम्ही हात बांधून गप्प का बसला आहात, असा सवाल केला आहे.

**सामाजिक समतेवरच घाला : भुजबळ**

तर या घटनेवर समता परिषदेचे अध्यक्ष आणि मंत्री छगन भुजबळ आक्रमक झाले. महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना केल्याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी छगन भुजबळ यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांकडे केली आहे. तेलंगणात सामाजिक विचारांवर हल्ला सुरू असल्याचा आरोप करत महात्मा फुले पुतळा विटंबनेवर भुजबळ आक्रमक झाले. महात्मा फुले यांच्या पुतळ्यावर हल्ला म्हणजे सामाजिक समतेवरच घाला असल्याचे मत भुजबळांनी व्यक्त केले.

### णमोकार तीर्थावर मुख्यमंत्री

दिले आणि मार्गदर्शन केलं. या प्रसंगी खासदार प्रफुल पटेल म्हणाले की, ''कुंथुसागर आणि देवनंदी महाराज यांचे दर्शन घेणाचं भाग्य लाभले. पवित्र आणि शुद्धता या णमोकार तीर्थावर आहेत. दिगंबर समाज संख्येने कमी असला तरी देश घडविण्यात अग्रेसर समाज आहे. कोणत्याही क्षेत्रात दिगंबर जैन समाज पुढे आहे. आपल्या धर्मगुरूचे आशीर्वाद आहेत, ते अनवाणी चालतात, त्याग करतात. अशा आपल्या गुरुजनांना नमस्कार करतो. यावेळी णमोकार तीर्थक्षेत्रसाठी राज्य सरकारने भरीव मदत करावी अशी मागणी मी करतो.नाशिकच्या चांदवड तालुक्यातील मालसाने येथील णमोकार तीर्थ येथे सुरू असलेल्या पंचकल्याणक महोत्सवात मोठ्या भक्तिभावात पार पडत आहे. त्यासाठी प्रशासनातर्फे कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. दोन दिवसांपासून सुरू असणाऱ्या या महोत्सवात आज सकाळी ६.३० वाजल्यापासून यज्ञशाळेत अभिषेक आणि हवनाने दिवसाची सुरुवात झाली आहे. भगवान जन्मकल्याणक विधीसह विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले आहेत.

### शिक्षणात 'एआय' अभ्यासासाठी

निवडू शकतील. भाषा बदलली तरी शिक्षकाचा टोन आणि शिकवण्याची पद्धत तीच राहील. हे इंटरॲक्टिव्ह असेल, ज्यामुळे विद्यार्थी प्रश्न विचारून त्वरित उत्तरे मिळवू शकतील. वर्गखोलीपासून ते स्पर्धा परीक्षांपर्यंत व्यासपीठ मदत करेल हे व्यासपीठ विद्यापीठाच्या स्तरावरील शिक्षण, स्पर्धा परीक्षांची तयारी, लॅब टेस्टचा थ्री–डी अनुभव आणि रिसर्च स्कॉलर्सच्या संशोधनातही मदत करेल. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितले की, अलीकडेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या आवाजात आणि टोनमध्ये, एआयच्या माध्यमातून अर्थसंकल्पीय भाषण हिंदी आणि कन्नडमध्ये प्रसारित करण्यात आले होते. याच तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणात केला जाईल.शिक्षणात एआयच्या संस्थात्मक वापराला प्रोत्साहन देण्यासाठी १२ फेब्रुवारी रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपममध्ये 'बोधन एआय' उपक्रमाची औपचारिक सुरुवात केली जाईल. या प्रसंगी 'भारत बोधन एआय कॉन्क्लेव्ह'मध्ये निवडक एआय सोल्यूशन्सचे प्रदर्शनही केले जाईल. भारत बोधन एआय स्टॅक अंतर्गत शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, कौशल्य विकास, एआय संशोधन आणि डीप टेक्नॉलॉजीशी संबंधित प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. हे सर्व राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याशी सुसंगत असतील. हे प्लॅटफॉर्म टप्प्याटप्प्याने देशभरात लागू केले जाईल.

### मतदानानंतर ईव्हीएम

उमेश पाटील यांनी हा प्रकार समोर आणला. स्वराज्य बार अँड हॉटेल परिसरात संशयास्पद प्रकार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर उमेश पाटील कार्यकर्त्यांसह तिथे पोहोचले होते. मोहोळमधील या प्रकारावर उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख म्हणाले, मशीन ढाब्यावर आढळणे हा प्रकार दुर्दैवी आणि गंभीर आहे. या प्रकरणी आम्ही संबंधितांवर कारवाई करणार आहोत. आढळून आलेल्या ईव्हीएम मशीन अतिरिक्त होत्या. त्या मतदानासाठी वापरण्यात आलेल्या नाहीत असा खुलासा त्यांनी केला. झोनल अधिका–यांकडे अतिरिक्त दोन मशीन ठेवण्यात आल्या होत्या. मात्र, वाहन चालक आणि अधिकारी यांच्यात संवाद न झाल्याने हा प्रकार घडला असावा. त्या मशीन स्ट्राँग रुममध्ये स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आल्या आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि.९ फेब्रुवारी २०२६ | ३

### घरकुलचे थकीत हप्ते तातडीने द्या

बीड : प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) अंतर्गत लाभार्थ्यांना अद्याप थकीत असलेले हप्ते तातडीने त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात यावेत, जेणेकरून घरकुलाच्या पुढील बांधकामाला गती मिळेल, अशी मागणी शाह अल्पसंख्यांक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी शेख जेबा कदीर यांनी नगरपालिका प्रशासनाकडे केली आहे. शहरात सध्या मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट वाढला असून शाळकरी मुलांवर हल्ल्याच्या घटना घडत आहेत. यामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच ज्येष्ठ नागरिकांनाही मोकाट कुत्र्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.या दोन्ही गंभीर प्रश्नांवर नगरपालिकेने तात्काळ उपाययोजना कराव्यात. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराहीजेबा कादिर शेख. अब्दुल कदिर शेख. जावेद शेख यांनी केली यांनी दिला आहे.

# ग्लोबल विकास ट्रस्टकडून ११ जोडप्यांचा भव्य सामुदायिक विवाह सोहळा

## हुंडा न घेण्या -देण्याची शपथ; प्रत्येक जोडप्यांच्या नावे २५ हजारांची बचत ठेव

परळी । प्रतिनिधी

ग्लोबल विकास ट्रस्टच्या पुढाकारातून आणि उद्योजक राजेश मेहता यांच्या सहकार्यातून यावर्षीचा भव्य असा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न झाला. आत्महत्याग्रस्त कुटुंब, अंध आणि अपंग असलेले पालक किंवा अतिशय दुर्बल आर्थिक स्थिती असलेल्या कुटुंबातील जोडप्यांची या सामुदायिक विवाह सोहळ्यात निवड करण्यात आली होती. कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्राच्या जवळ भव्य मंडप उभारण्यात आला होता. सिरसाळा - पोहनेर रोड लागत संपन्न झालेल्या भव्य विवाह सोहळ्यास ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, नीती आयोगाचे सदस्य रमेश चंद, डॉ.हरिश्चंद्र वंगे, संजय परमार आदींसह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नव वधू आणि वरांना शुभाशीर्वाद दिले.

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि राजेश मेहता यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा सामूहिक विवाह सोहळा अतिशय उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या विवाह सोहळ्यास हजारो पाहुण्यांची उपस्थिती होती. उपस्थितांच्या साक्षीने सर्वांना हुंडा न देण्याची आणि घेण्याची




शपथ देण्यात आली, त्याबरोबरच कोणीही कुठल्याही कारणाने आत्महत्या करणार नाही आणि आजुबाजूला कोणाला करू देणार नाही. नैराश्याच्या गर्तेत जर कोणी निदर्शनास आले तर त्याच्या अडचणी सोडवण्यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट नक्कीच प्रयत्नशील राहील. गोरगरिबांचे आशिर्वाद आणि त्यांच्या शुभेच्छा याच माझ्यासाठी मोठी संपत्ती असून यामुळेच भविष्यात अधिकाधिक काम करण्याची ऊर्जा मला मिळते. दरवर्षी असा अतिभव्य विवाह सोहळा आयोजित करून गोरगरीब कुटुंबांना मदतीचा हात देण्याचीही घोषणा आजच्या विवाह सोहळा प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना जलनायक मयंक गांधी यांनी बोलून दाखवली. यंदाच्या विवाह सोहळ्यात सहभागी ११ जोडप्यांच्या नावे रुपये २५ हजारांची बचत ठेव ठेवण्यात येणार असल्याचेही संयोजकांनी घोषित केले. विवाह सोहळ्यात सहभागी वधूला सोन्याचे मणी मंगळसूत्र तसेच पैंजणही भेट देण्यात आले. आलेल्या सर्व वऱ्हाडी मंडळीची भोजन आणि बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. च्या सर्व स्वयंसेवकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

### ११ जोडप्यांच्या नावे प्रत्येकी २५ हजारांची बचत ठेव

ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने दरवर्षी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदाही सलग दुसऱ्या वर्षीचा विवाह सोहळा संपन्न झाला. या विवाह सोहळ्यात सहभागी जोडप्यांना संसारोपयोगी साहित्य, वधूला सोन्याचे मणी मंगळसूत्र व पायातील पैंजण आणि त्याचबरोबर प्रत्येक जोडप्याच्या नावे २५ हजारांची बचत ठेव बँकेत करण्यात येत आहे. कॉट, गादी, संसारोपयोगी भांडे तसेच अन्य वस्तूंची भेटही या विवाह सोहळ्यात देण्यात आली असून, दरवर्षी हा सोहळा आयोजित केला जाईल असेही घोषित करण्यात आले.

## स्वामी समर्थ सेवा मार्गाचे कार्य समाजाला दिशादर्शक - डॉ. शेटे

### श्री स्वामी समर्थ पालखी सोहळ्याने दिंद्रुड झाले स्वामीमय



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील दिंद्रुड येथे दि. ७ फेब्रुवारी शनिवार रोजी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाच्या वतीने ग्रामाभियानांतर्गत श्री स्वामी समर्थ संदेश यात्रेचे (पालखी सोहळा) आयोजित करण्यात आला होता.या प्रसंगी आयुष्मान भारत चे महाराष्ट्र राज्याचे प्रमुख डॉ ओमप्रकाश शेटे बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की,श्री स्वामी समर्थ सेवा मार्ग ग्रामाभियानाच्या अठरा विभागाच्या माध्यमातून समाजाला दिशा देण्याचे काम करत आहे.फक्त आध्यात्मिक कार्य, कर्मकांड येवढ्या पुरता हा मार्ग नसून परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे हे २०% अध्यात्म आणि ८०% सामाजिक उपक्रम या माध्यमातून राबवतात.तसेच सद्गुरू प.पू. मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या मोफत आरोग्य तपासणी शिबिर हे इतर आरोग्य तपासणी शिबीरांपेक्षा वेगळे आहे,अध्यात्मातून मनःशांती प्रदान करणारे श्री स्वामी समर्थ सेवा कार्य आहे असे त्यांनी सांगितले.

ही संदेश यात्रा टाळ, मृदंगाच्या गजरात श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या नाम घोषाने संपूर्ण दिंद्रुड शहर स्वामीमय झाले. संदेश यात्रेचे जागोजागी पूजन करण्यात आले. यावेळी संत ज्ञानोबा माऊली वारकरी शिक्षण संस्था,गावातील कलशधारी महिला, मुली,पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी सहा वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांची महानैवेद्य आरती डॉ ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते संपन्न झाली.

## स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त लिंबागणेश येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

लिंबागणेश। प्रतिनिधी

स्व. अमोल गलधर यांच्या जयंतीनिमित्त आज रविवार दि. ०८ रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्व. अमोल गलधर युवा मंच, लिंबागणेश यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्व. अमोल गलधर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आली. यावेळी लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋषिकेश आंधळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याचा व जनतेसाठी दिलेल्या लढ्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

स्व. अमोल गलधर यांनी बीड रेल्वेसाठी उभारलेला संघर्ष, टॉवरवर चढून केलेले शोले स्टाईल आंदोलन, आकाशवाणी बंद पाडण्याचे आंदोलन, तसेच तत्कालीन केंद्रीय रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पुतळ्याचे दहन करून त्याची राख शासकीय कार्यालयात पाठवण्याचे धाडसी आंदोलन यामुळे ते



सर्वसामान्य जनतेत लोकप्रिय होते. यासोबतच बीड जिल्हा रुग्णालयात गोरगरिबांच्या सेवेसाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे, असे मत तंटामुक्ती समिती अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले. स्व. अमोल गलधर यांच्या सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत स्व. अमोल गलधर युवा मंचच्या पदाधिकाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली, याबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे विशेष कौतुक केले. ''रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे. आपण दिलेले रक्त संकटाच्या वेळी अनेकांचे प्राण वाचवू शकते. रक्तपेढ्यांमध्ये नेहमीच रक्ताची टंचाई असते, त्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना मोठी धावपळ करावी लागते. अनेक वेळा रक्त न मिळाल्याने दुर्दैवी घटना घडतात. अशा परिस्थितीत रक्तदान करून गरजू रुग्णांना मदत करण्याची संधी युवा मंचने उपलब्ध करून दिली आहे,'' असे मत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले. हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी स्व. अमोल गलधर युवा मंचचे पदाधिकारी शंकर वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, सुरज कदम, सचिन आगवान, करन वायभट, संतोष शिंदे यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील रक्तपेढीचे कर्मचारी गणेश रोटे, संतोष गायकवाड, सतीश गायकवाड यांनी रक्तसंकलन केले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी दत्ता झोडगे, ज्योत्स्ना शिंदे, सीमा हिंदोळे यांच्यासह ॲड. गणेश वाणी, दादा गायकवाड, बाळकृष्ण थोरात, रामचंद्र मुळे, अक्षय येडे, गणेश घाडगे, ओंकार पवार, उमेश थोरात, बबलू आबदार, पप्पू थोरात, रोहित तागड, केशव गिरे, विजय वाणी, जीवन मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## स्वामी समर्थ सेवा केंद्रात मोफत आरोग्य शिबीर संपन्न

### सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर चा उपक्रम

धारुर । प्रतिनिधी

परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व गुरुपुत्र आदरणीय दादासाहेबांच्या आदेशानुसार सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.

या शिबीराची सुरुवात दिपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करुन झाले यावेळी सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर चे डॉ मोहनराव गौरकर, डॉ श्रीकांत



सलोने, माजी नगराध्यक्ष डॉ स्वरुपसिंह हजारी, पोलिस निरीक्षक देवीदास वाघमोडे, पोलिस कॉन्स्टेबल मुकुंद ढाकणे, डॉक्टर असोसिएशन चे अध्यक्ष डॉ मयुर सावंत, क्रिडाधिकारी श्रीमती राखी यादव, डॉ नवनाथ चव्हाण, पत्रकार अनिल महाजन अड प्रमोद मिश्रा, परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटर चे डॉ प्रेरणा भोईर, डॉ रुचा ठाकुर, डॉ आकांक्षा जाधवर, डॉ प्रतिक्षा पाटील, डॉ दिपाली पतंगे, डॉ जितेन पाटील, डॉ शेख शकिल, केंद्र प्रतिनिधी तृप्तीताई मिश्रा, आरोग्य दूत जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे इत्यादी उपस्थित होते. यावेळी पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे, डॉ मयुर सावंत, पत्रकार अनिल महाजन यांनी मनोगत व्यक्त करताना श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी शहरातील महिला, पुरुष, ग्रामस्थ, नागरिक, सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी स्थानिक केंद्रातील सर्व प्रतिनिधी व कार्यरत सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.

## डॉ अजित हावळे यांना पितृ शोक

चौसाळा । प्रतिनिधी



चौसाळा येथील प्रसिद्ध डॉक्टर अजित हावळे यांच्या वडिल व चांदेगाव येथील बागायतदार मदनरावजी हावळे यांचे काल दिनांक ०८ ०२ २०२६ रोजी पहाटे ३.३० वाजता रुग्णालयात उपचार असताना निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ८१ होते कै मदनराव रविवारी सकाळी त्यांच्यावर त्यांच्या गावी चांदेगाव येथे अंत्यसंस्कार केले त्यांच्या अंत्यसंस्कारला पंचक्रोशीतील नातेवाईक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यांच्यामागे पत्नी दोन मुले सुना नातवंड असा परिवार होता

## शेख अमान अफरोज यांना प्रथम पारितोषिक प्रधान

बीड । प्रतिनिधी

राज्यस्तरीय बँकिंग स्पर्धा २०२६ मध्ये बीड येथील स्पर्धेच्या खेळामध्ये उत्कृष्ट कुशल अभ्यासक असलेले दोन्ही विद्यार्थी शेख अमन व अफरोज यांना प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले याच अनुषंगाने बीड येथे त्यांचा सत्कार करताना भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी दोन्ही उत्कृष्ट खेळाडू विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला व पुढील उत्कृष्ट खेळासाठी शुभेच्छा दिल्या या वेळी उपस्थित असलेले राहुल दादासाहेब जोगदंड तसेच लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक बीबी वैद्य लोकशाही पत्रकार संघाचे राजकीय विकास समितीचे प्रदेशाध्यक्ष यशवंत कदम साहेब प्रवीण चव्हाण तसेच बीड जिल्हा संघटक संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर समीर शहरातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# जपानच्या सागा प्रांताच्या गव्हर्नरच्या शिष्टमंडळाने घेतली पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची भेट

## नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची आज जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर व उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भेट घेऊन पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा केली.नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम असून यासाठी जपानचे सहकार्य मोलाचे ठरेल असा विश्वास पर्यावरण व दुग्धविकास मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला. समुद्रातील व नदीतील प्रदूषण रोखणे, प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध संयुक्त प्रयत्न करणे तसेच शिक्षण, पशुसंवर्धन आणि सौंदर्यप्रसाधन उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढविण्याबाबतही यावेळी महाराष्ट्र आणि जपानच्या शिष्टमंडळात सकारात्मक चर्चा झाली. पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवास्थानी झालेल्या या बैठकीला जपानच्या सागा प्रांताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सागा प्रांताचे गव्हर्नर योशिनोरी यामागुची यांनी केले. त्यांच्यासमवेत प्रादेशिक देवाणघेवाण विभागाचे उपमहासंचालक मसाहिरो ओनो, आंतरराष्ट्रीय धोरण गटाचे उपसंचालक कोजी योशिताके,



प्रकल्प प्रमुख कोकी कनामारू आणि जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा उपस्थित होते.

तर राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंह आदी उपस्थित होते. महाराष्ट्राला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. मात्र, समुद्रातून वाहून येणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. त्याचबरोबर नद्यांमधील प्रदूषण हीदेखील चिंतेची बाब असून, भारतीय संस्कृतीत नद्यांचे पवित्र स्थान लक्षात घेता त्यांच्या स्वच्छतेसाठी राज्य शासन विशेष कार्यक्रम हाती घेणार आहे, असे मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी राज्यपाल यामागुची यांनी जपानकडील तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापन अनुभव आणि संशोधन क्षमता महाराष्ट्रासोबत सामायिक करण्याची तयारी दर्शवली. आशियाई समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी ''ज्ञान भागीदारी''च्या माध्यमातून संयुक्त उपक्रम राबविण्याबाबत दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिकेवर यावेळी चर्चा झाली. बैठकीत शिक्षण क्षेत्रातील सहकार्यालाही विशेष महत्त्व देण्यात आले. पर्यावरणीय शाश्वतता, पशुविज्ञान आणि वैज्ञानिक संशोधनासाठी परदेशी विद्यापीठांना राज्यात संधी उपलब्ध करून देण्याची तयारी पर्यावरण मंत्री श्रीमती मुंडे यांनी व्यक्त केली. सागा प्रांतामधील संस्थांबरोबर संयुक्त संशोधन, विद्यार्थी देवाणघेवाण आणि तांत्रिक सहकार्याच्या शक्यता यावरही यावेळी चर्चा झाली. दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील नवकल्पना तसेच सौंदर्यप्रसाधन उद्योगातील जपानचे प्रगत तंत्रज्ञान महाराष्ट्रासाठी उपयुक्त ठरू शकते, असे शिष्टमंडळाने नमूद केले. या क्षेत्रांत औद्योगिक व शैक्षणिक सहकार्य वाढविण्याची परस्पर तयारीही व्यक्त करण्यात आली.प्लास्टिक व्यवस्थापनासाठी उभारण्यात येणाऱ्या वर्ल्ड ओशन प्लास्टिक प्लॅनिंग सेंटर या केंद्राला भेट देण्याचे निमंत्रण राज्यपाल यामागुची यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांना दिले. भविष्यात परस्पर दौरे, तांत्रिक कार्यशाळा आणि दीर्घकालीन सहकार्य आराखडा तयार करण्याबाबत यावेळी चर्चा झाली. पर्यावरण संरक्षण, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील भारत-जपान सहकार्याला ही बैठक नवे परिमाण देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये परीक्षा पे चर्चा



किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांशी व शिक्षकांची संवाद साधला. परीक्षेला कसे सामोरे जायचे याविषयी विद्यार्थी व शिक्षकांचा आत्मविश्वास, मनोबल वृद्धिंगत करण्यासाठी संवाद साधला. तसेच राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक तसेच अकरावी, बारावी बोर्ड परीक्षा देणारे परीक्षार्थी अन्य विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे लाईव्ह स्ट्रीमिंगची व्यवस्था करण्यात आली होती. यामुळे विद्यार्थ्यांनी मा. पंतप्रधान महोदयांचे संवाद रुपी विचार सक्रिय सहभागी होऊन ऐकले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य डॉ. एम.एन. गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालयीन अधीक्षक सुभाष वायाळ यांची उपस्थिती होती.

cmyk

# वाढत्या तापमानात पपई, पेरु बागेची काळजी

जास्त तापमानामुळे पपई ची पानं करपणे, फळावर चट्टे पडण, फळातील गर खराब होऊन फळे पिवळी पडून गळतात. तर पेरुच्या आंबे बहरातील फळांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. पपई पिकाला सरासरी २२ ते २६ अंश सेल्सिअस तापमान मानवते. पण तापमानाचा पारा ४० च्या वर गेल्यास जमिनीतील तापमानामुळे उष्णतेचा परिणाम मुळांवर होतो. त्यामुळे मुळे खराब होतात. मुळांचे अन्नद्रव्य आणि पाणी शोषण करण्याचं काम मंदावते. फळांचा आकार लहान राहतो आणि फळाच्या गरामध्ये साका तयार होतो. त्यामुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट होते.

वाढलेल्या तापमानामुळे पपई झाडावर पांढरी माशी, तुडतुडे या रसशोषक किडी आणि काही विषाणूजन्य रोगही पडतात. त्यामुळे पानांचा रंग हिरवट पिवळसर होतो. पानांवर सुरकुत्या पडतात. जास्त प्रादुर्भावामध्ये फळावर पिवळे चट्टे पडतात. त्यामुळे फळांची प्रत खालावते.पपई बागेत जर अशा समस्या येत असतील तर, बागेला ठिबक सिंचनाद्वारे शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावं. झाडाच्या खोडाच्या चारही बाजूंनी शेतातील उरलेल्या काडीकरचऱ्याचं आच्छादन कराव. आच्छादनाचा थर साधारणपणे ३ ते ४ इंच इतका खोडाच्या चारही बाजूंनी करावा. बागेत ६० ते १०० मायक्रॉन जाडीच काळ्या रंगाच प्लॅस्टिक



आच्छादन कराव. झाडावर ५ ते ८ टक्के तीव्रतेच्या बाष्परोधकाची १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी.याशिवाय झाडाच्या आळ्यात मटाका सिंचनाने पाणी दिले तरी जमिनीत ओलावा टिकून राहतो. बागेभोवती वारा प्रतिबंधक कुंपण केल्यासही बागेच उन्हापासून संरक्षण होतं. नवीन लागवड केलेल्या झाडांना गोणपाट किंवा जुन्या साड्या लावून सावली करावी.सायंकाळच्या वेळी संपूर्ण झाडावर एक दिवसाआड पाण्याचा फवारा पंपाने करावा. पिकाची पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढविण्यासाठी पानांवर १ ते दीड टक्के पोटॅशिअम नायट्रेट द्रावणाची फवारणी करावी. याशिवाय कडक उन्हात पेरु बागेला जर पाणी कमी पडत असेल तर फूलगळ, फळगळ होते. लहान फळे पिवळी पडून गळतात. झाडाची पाने सुकतात, करपतात. बागेतील उघडी पडलेली फळे कडक उन्हामुळे अकाली पिवळी पडतात.फळांमध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. तापमान वाढीमुळे फळांची गुणवत्ताही खालावते. अशा वेळी लक्षणे ओळखून लगेच उपाय करावे लागतात. उपाय करताना..पेरु बागेतील काळी पडलेली, वाळलेली फळे आणि झाडाखाली गळून पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत. झाडातून होणारं पाण्याचं बाष्पीभवन कमी होण्यासाठी केओलिनच्या ८ टक्के द्रावणाची फवारणी करावी. केओलीनची फवारणी केल्यामुळे पिकाच्या पानांवर तसच फळांवर पातळ पांढरा थर तयार होतो. हा पांढऱ्या रंगाचा थर तीव्र सूर्यकिरणे पानांत किंवा फळांत जाऊ न देता तो वातावरणात परावर्तित करतो. त्यामुळे पानांमधून होणारे बाष्पोत्सर्जन २५ ते ३० टक्क्यांनी कमी होतं. कमी पाण्यातही पीक तग धरुन राहतं. दुष्काळी परिस्थितीत झाडे तग धरून राहण्यासाठी १ टक्के पोटॅशिअमची फवारणी केली तरी चालते. तसेच हलकी छाटणी करून झाडाचा आकार मर्यादित ठेवावा. त्यामुळे झाडाची पाण्याची गरज कमी होते. फळमाशीच्या नियंत्रणासाठी बागेत प्रति हेक्टरी १० कामगंध सापळे लावावेत. अशा प्रकारचे उपाय करुन कडक उन्हापासून पपई आणि पेरु बाग वाचवता येते.

# डाळिंब बागेत फळधारणा अवस्थेत 'असे' करा रसशोषक किडींचे नियंत्रण

सध्या डाळिंब बागेत मृगबहार अवस्थेतील फुलधारणा आणि फळधारणा वेळी पिकावर फुलकिडी, मावा, पांढरी माशी यासारख्या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. या रसशोषक किडींचे नियंत्रण उपाय जाणून घेऊ या.

डाळिंब बागेत रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण :

बागेत स्वच्छता राखावी, तणांचे वेळीच नियंत्रण करावे. झाडाच्या शेंड्याच्या १५ सेंटिमीटर खाली नागमोडी पद्धतीने पिवळे/निळे चिकट सापळे २५-३० सापळे प्रति एकर याप्रमाणात लावावेत. रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी पहिली फवारणी स्पिनेटोरम १२% एससी १.० मिली/लिटर किंवा स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटर पाणी + ०.२५ मिली/लिटर स्प्रेडर स्टिकर याप्रमाणात फवारणी करावी.

रसशोषक किडींसाठी दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर ७-१० दिवसांनी, स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटरची दुसरी फवारणी किंवा निंबोळी तेल १% (१०००० पीपीएम) ३.० मिली/लिटर किंवा पोंगामिया तेल (करंज तेल) ३ मिली/लिटर किंवा नीमतेल + पोंगामिया तेल प्रत्येकी ३ मिली/लिटर + ०.३ मिली/लिटर स्प्रेडर स्टिकरच्या मिसळून फवारणी करावी.

तिसरी फवारणी स्पिनेटोरम १२% एससी १.० मिली/लिटर किंवा स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटर + ०.२५ मिली /लिटर स्प्रेडर स्टिकर मिसळून फवारणी करावी. सायंकाळच्या वेळी बागेत धूर करावा. रसशोषक किडीवर उपजीविका करणाऱ्या परोपजीवी किडींचे (क्रायसोपर्ला, ढालकीडा, क्रिप्टोलेमस, सिरफिड माशी इ.) संवर्धन करावे.



# अग्निअस्त्र घराच्या घरी तयार करण्याची सोपी कृती



शेतकरी बंधुनो रासायनिक शेतीला फाटा देत जैविक शेतीकडे वळण्याचे आवाहन केंद्रातल्या मोदी सरकार कडूनही केले जाते आहे. जैविक शेतीमध्ये जीवामृत, अग्नी अस्त्र अशा घटकांचा उल्लेख वारंवार केला जातो. शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम किसान योजनेचा १० वा हप्ता जारी केला. त्या कार्यक्रमात देखील अग्निस्त्रचा उल्लेख केला गेला होता. सेंद्रिय शेतीमध्ये वापरले जाणारे अग्निअस्त्र म्हणजे काय ? ते घराच्या घरी कसे तयार केले जाते याची माहिती घेऊया अग्नी अस्त्र म्हणजे काय ? अग्नी अस्त्र हे जैविक शेतीमध्ये वापरले जाणारे प्रभावी कीटक नाशक आहे. अग्नी अस्त्राचा उपयोग स्टेम कीटक आणि फळातील अळी यांच्या नियंत्रणासाठी केला जातो.पिकांच्या शेंगा व फळे पोखरणारी अळी, पाने खाणारी अळी यांच्या प्रादुर्भावापासून नियंत्रणासाठी हे द्रावण उपयुक्त आहे.


साहित्य : २० लिटर देशी गायीचे गोमुत्र. ५०० ग्रॅम हिरव्या मिरचीची चटणी. ५०० ग्रॅम गावराण लसूणाची चटणी. ५ किलो कडुलिंबाच्या पानांचा लगदा. १ किलो तंबाखू बारीक करून ( तंबाखू विक्रेत्यांकडे तंबाखूचा उरलेला चुरा किंवा दात घासण्यासाठी बनविण्यात येणारी मशेरी किंवा मिसरी बनविण्यासाठी लागणारी भुकटीसारखी तंबाखू जिला आकोट असेही संबोधतात, ती तंबाखूपेक्षा स्वस्त दरात मिळू शकते). अग्नी अस्त्र कृती : वरील सर्व साहित्य एका पात्रात घेऊन त्यास आचेवर ठेवून उकळा. चार ते पाच उकळ्या येउ द्या. त्यानंतर हे द्रावण आचेवरून उतरवुन थंड होऊ द्या. साधारण दोन दिवसानंतर (४८ तास) हे द्रावण फडक्याने गाळून घ्या. लगेच वापर करणार नसल्यास प्लास्टिक किंवा काचेच्या पात्रात साठवून ठेवा. बनविल्यापासून ३ महिन्यांपर्यंत या द्रावणाचा प्रभाव उत्तम आहे. या काळानंतर द्रावणाची कीटनाशक शक्ती कमी होत जाते. १०० लिटर पाण्यात ३ ते ५ लिटर अग्नीअस्त्र या प्रमाणात मिसळून पिकांवर फवारावे.

महत्वाच्या बाबी : वापरल्या जाणाऱ्या सामग्रीच्या थोड्या फार फरकाने देशभरात विविध नावाने हे द्रावण प्रचलित आहे. काही भागात यास ''लमित'' अर्क म्हणजेच लसूण+मिरची+तंबाखू अर्क या नावाने तर उत्तरे कडील भागात लहसून मिर्च अदरक का अर्क या नावाने हे द्रावण प्रचलित आहे. यात केवळ लसूण, मिरची व आले (अद्रक) एकत्र वाटून त्याचा अर्क पाण्यात मिसळून वापरले जाते. बहुतांशी कीटक व अळ्यांचे श्वसन हे त्वचे मार्फत होत असते. द्रावणातील तिखट अर्क फवारणीद्वारे त्यांच्या त्वचेवर पडताच श्वसनावरोध (श्वसनास अडथळा) होऊन त्या मरतात किंवा निष्प्रभ होतात.

# बिनकाटेरी निवडुंग : दुष्काळातही हिरवा चारा देणारे पीक!

पाण्याची कमतरता, वाढता खर्च आणि बदलते हवामान यामुळे शेतकऱ्यांसमोर हिरव्या चाऱ्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. विशेषतः उन्हाळ्यात आणि दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देणे अवघड ठरते. अशा वेळी बिनकाटेरी निवडुंग हे पीक हिरव्या चाऱ्याचा उत्तम आणि किफायतशीर पर्याय ठरू शकते. कमी पाण्यात तग धरणारे, कमी खर्चात जास्त उत्पादन देणारे आणि पोषणमूल्यांनी समृद्ध असे हे पीक शेतकऱ्यांसाठी खूपच फायदेशीर आहे.

चाऱ्यासाठी अ से आहे फायद्याचे : बिनकाटेरी निवडुंग कोरडवाहू तसेच दुष्काळी भागातही सहज वाढतो. खडकाळ किंवा मुरमाड जमिनीतही त्याची वाढ चांगली होते. या पिकामध्ये प्रथिने, तंतुमय घटक तसेच कॅल्शियम, फॉस्फरस आणि पोटॅशियमसारखी महत्त्वाची खनिजे मुबलक प्रमाणात असतात. निवडुंगामध्ये सुमारे ८५ टक्के पाण्याचे प्रमाण असल्यामुळे उन्हाळ्यात जनावरांच्या पाण्याच्या गरजेचा काही भागही यामुळे पूर्ण होतो. हिरव्या चाऱ्याची टंचाई असताना निवडुंगाचा वापर केल्यास सुमारे ३० टक्के चाऱ्याची गरज भागवता येते. जनावरांच्या आहारात निवडुंगाचा वापर करताना त्याची पिकलेली पाने कापून ८ ते १०




लहान तुकड्यांत कापावीत. ही पाने सुक्या चाऱ्यासोबत मिसळून जनावरांना खाऊ घालावीत. विविध प्रयोगांमधून असे आढळून आले आहे की एका शेळीला दररोज ३ ते ४ किलो, तर एका दुभत्या गाईला ७ ते ८ किलो निवडुंगाची पाने सुरक्षितपणे देता येतात. यामुळे जनावरांचे वजन वाढते, पोषण सुधारते आणि कोणतेही दुष्परिणाम दिसून येत नाहीत.

चारा पीक म्हणून निवडुंगाची लागवड : चारा पीक म्हणून निवडुंगाची लागवड करताना योग्य वाणाची निवड महत्त्वाची आहे. १२७०, १२७१, १२८० आणि १३०८ हे वाण चाऱ्यासाठी उपयुक्त मानले जातात. यामध्ये १२८० हा वाण हिरव्या चाऱ्यासाठी विशेष चांगला समजला जातो. लागवड साधारणपणे ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत करता येते.लागवडीसाठी एक वर्ष वयाची पूर्ण वाढ झालेली पाने निवडावीत. ही पाने लागवडीपूर्वी काही दिवस सावलीत सुकवावीत आणि नंतर बुरशीनाशक द्रावणात बुडवून घ्यावीत. ३ बाय २ मीटर अंतरावर लागवड केल्यास एका एकरात सुमारे ६६७ झाडे लावता येतात. लागवडीपूर्वी शेणखत तसेच संतुलित रासायनिक खतांचा वापर केल्यास उत्पादन चांगले मिळते. प्रत्येक कापणीनंतर थोडे नत्र खत दिल्यास नवीन फुटव्यांची वाढ जोमाने होते.निवडुंगाला फारसे पाणी लागत नाही. लागवडीनंतर पहिल्या १० दिवसांत पाणी देऊ नये. त्यानंतर दर १५ दिवसांनी मर्यादित प्रमाणात पाणी दिले तरी पुरेसे ठरते. साधारण एक वर्षानंतर पहिली कापणी करता येते. प्रत्येक झाडापासून १० ते १२ किलो हिरवा चारा मिळतो आणि पुढील वर्षांमध्ये उत्पादनात वाढ होत जाते.




## महत्वाच्या घटना

१९००: लॉन टेनिस या खेळातील 'डेव्हिस कप' या करंडकाची सुरूवात झाली.
१९३३: साने गुरुजी यांनी नाशिकच्या कारागृहात असताना 'श्यामची आई' या पुस्तकाच्या लेखनाला सुरुवात केली.
१९५१: स्वतंत्र भारताची पहिली जनगणना सुरू
१९६९: बोइंग-७४७ विमानाचे पहिले चाचणी उड्डाण झाले.
१९७१: ''अपोलो १४ मिशन'' चंद्रावरून पृथ्वीवर सुरक्षित परत आले.
१९७५: रशिया चे सुयोज-१७ हे अवकाशयान २९ दिवसानंतर पुन्हा पृथ्वीवर सुरक्षित परत आले.
१९९९: भारतीय चित्रपट निर्माता शेखर कपूर यांचा एलिझाबेथ हा चित्रपट ऑस्कर साठी नॉमिनेट केल्या गेला.
२००३: संगीतकार रवींद्र जैन यांना मध्यप्रदेश सरकारचा लता मंगेशकर पुरस्कार प्रदान.
२०१०: बीटी-ब्रिंजल वाणाची शेती करण्यावर काही दिवसासाठी बंदी आली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४०४: शेवटचा बायझेंटाईन सम्राट कॉन्स्टन्टाईन (अकरावा) यांचा जन्म.
१७७३: अमेरिकेचे वे९ अध्यक्ष विल्यम हेन्री हॅरिसन यांचा जन्म. (मृत्यू: ४ एप्रिल १८४१)
१९१७: होमी जे. एच. तल्यारखान - गांधीवादी नेते, सिक्कीमचे पहिले राज्यपाल, मंत्री व आमदार (मृत्यू: २७ जून १९९८)
१९२२: जिम लेकर - इंग्लिश क्रिकेट खेळाडू (मृत्यू: २३ एप्रिल १९८६)
१९२९: महाराष्ट्रचे माजी मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर २०१४)
१९४०: प्रसिद्ध भारतीय लेखक विष्णू खरे यांचा जन्म.
१९४५: संसद चे माजी सदस्य श्याम चरण गुप्ता यांचा जन्म.
१९५८: भारतीय चित्रपट अभिनेत्री अमृता सिंह यांचा जन्म.
१९६८: भारतीय अभिनेता राहुल रॉय यांचा जन्म.
१९७०: ग्लेन मॅकग्रा - ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज
१९८४: ला भारतीय अभिनेत्री उदिता गोस्वामी यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७१: फ्योदोर दोस्तोवस्की - रशियन कादंबरीकार आणि तत्त्वज्ञ (जन्म: ११ नोव्हेंबर १८२१)
१८९९: भारतीय स्वातंत्र्य सैनिक बालकृष्ण चापेकर यांचे निधन.
१९१८: प्रसिद्ध भारतीय नृत्यांगना टी. बालासरस्वती यांचे निधन.
१९६६: दामूअण्णा जोशी - बालमोहन नाटक मंडळीचे संस्थापक. या संस्थेने प्रल्हाद केशव अत्रे यांची अनेक नाटके केली.
१९७९: राजा परांजपे - चित्रपट दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते (जन्म: २४ एप्रिल १९१०)
१९८१: एम. सी. छागला - न्यायाधीश, मुत्सद्दी आणि केंद्रीय मंत्री (जन्म: ३० सप्टेंबर १९००)
१९८४: तंजोर बालसरस्वती - भरतनाट्यम नर्तिका (जन्म: १३ मे १९१८)
२०००: शोभना समर्थ - चित्रपट अभिनेत्री व निर्माती (जन्म: १९१५)
२००१: माजी हवाई दल प्रमुख, एर चीफ मार्शल दिलबागसिंग यांचे निधन.
२००६: भारतीय अभिनेत्री नादिरा यांचे निधन.
२००८: डॉ. मुरलीधर देविदास ऊर्फ बाबा आमटे - कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहून घेणारे थोर समाजसेवक (जन्म: २६ डिसेंबर १९१४)
२०१२: प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक ओ. पी. दत्ता यांचे निधन.

# शेतकऱ्यांनो फेब्रुवारी महिन्यात करा या ५ भाज्यांची लागवड

देशातील शेतकरी हंगाम आणि महिन्यानुसार त्यांच्या शेतात विविध पिके घेतात. जेणेकरून त्यांना त्यांच्या शेतीतून वेळेत चांगले उत्पन्न मिळू शकेल. याच अनुषंगाने शेतकऱ्यांसाठी फेब्रुवारी महिन्यात कोणत्या टॉप ५ भाज्यांच्या लागवड करावी याची माहिती जाणून घेण्याची गरज आहे.

तूर, मिरची, भेंडी, कारले आणि भोपळा या प्रमुख पाच भाज्यांना बाजारात मागणी खूप आहे. शेतकऱ्यांना त्याची लागवड करताना फार कष्ट करण्याची गरज नाही. तूर : तुरीची लागवड जवळपास सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते. याशिवाय जिवाणू असलेल्या नाल्यातही पेरणी करता येते. उष्ण आणि दमट हवामान आवश्यक असते. बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या तुरीची लागवड सुरू करण्यासाठी फेब्रुवारी हा सर्वोत्तम महिना आहे. कोरड्या कडधान्याच्या बियांपासूनही तेल काढता येते. पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने त्याचे अनेक आरोग्यदायी फायदेही आहेत.

कारले: शेतकरी जवळपास सर्व प्रकारच्या जमिनीत कारल्याची लागवड करू शकतात. परंतु कारली पिकापासून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी चांगला निचरा होणारी चिकणमातीची जमीन आवश्यक आहे. मिरची : मिरचीची लागवड खरीप आणि रब्बी पीक म्हणून करता येते. शेतकरी कधीही त्यांच्या शेतात मिरचीचे पीक लावू शकतात. खरीप पिकांसाठी पेरणीचे महिने मे ते जून असतात तर रब्बी पिकांसाठी सप्टेंबर ते ऑक्टोबर. परंतु उन्हाळी पीक म्हणून मिरचीची लागवड केल्यास जानेवारी आणि फेब्रुवारी हे महिने उत्तम मानले जातात.

भोपळा : देशातील शेतकरी डोंगराळ भागात तसेच सपाट भागात सहजपणे भोपळा लागवड करू शकतात. लागवडीसाठी उष्ण व दमट हवामान आवश्यक असते. भोपळा बिया शेतात पेरण्यापूर्वी २४ तास पाण्यात भिजत ठेवा. हे बियाणे उगवण प्रक्रियेला गती देते. या प्रक्रियेनंतर बियाणे शेतात पेरण्यासाठी तयार होते. भेंडी : भेंडी ही भारतीय बाजारपेठेत सर्वाधिक खरेदी केलेली भाजी आहे. ही एक भाजी आहे जी देशाच्या बहुतेक भागात लागवड केली जाते. भेंडीचे तीन मुख्य लागवड हंगाम फेब्रुवारी-एप्रिल, जून-जुलै आणि ऑक्टोबर-नोव्हेंबर आहेत. या काळात शेतकरी भेंडी लागवड करून चांगले उत्पन्न मिळवू शकतात.

# पोलीस दलात दोन नविन अत्याधुनिक सर्व्हेलन्स वाहने उपलब्ध

जालना। प्रतिनिधी

अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या माध्यमातून जालना जिल्हा पोलीस दलासाठी दोन अत्याधुनिक सर्व्हेलन्स बस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. याचा वापर बंदोबस्त, मोर्चे, आंदोलन आणि संवेदनशिल परिस्थितीत ३६० अंशात फिरणाऱ्या कॅमेऱ्यांमुळे नजर ठेवता येणार आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. या अत्याधुनिक बसेसमुळे बंदोबस्त, मोर्चे, आंदोलन आणि संवेदनशिल प्रसंगी प्रभारी निरीक्षक व नियंत्रण ठेवणे अधिक सुलभ होणार आहे.



सदर सर्व्हेलन्स बस पोलीस दलाच्या कार्यपद्धतीनुसार आवश्यक ते बदल करुन विशेष रित्या सुसज्ज करण्यात आलेल्या आहेत. या बसमध्ये चारही बाजूंना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असुन, त्याद्वारे परिसरावर सर्वदुर लक्ष ठेवणे शक्य होणार आहे. या बसेस विशेष उपकरणांनी सुसज्ज आहेत. बसच्या आतुन शिडीची सुविधा असुन, छतावर सहज उघडता येतील अशी फोल्डेबल रेलिंग बसविण्यात आली आहेत. यामुळे काही क्षणांतच निरीक्षणासाठी सुरक्षित जागा तयार करता येते. ऊन पावसांपासून संरक्षण करण्यासाठी छत्री बसविण्यासाठी स्वतंत्र व नियोजित जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या मंचावर उभे राहुन पोलीस अधिकारी व अंमलदार प्रभावीपणे बंदोबस्ताचे निरीक्षण करु शकतील.

या अत्याधुनिक सर्व्हेलन्स बसचे उद्घाटन मा.श्री. वीरेंद्र मिश्र, विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, प्रशिक्षणार्थी पोलीस अधिक्षक जान्हवी शेखर, तसेच तसेच जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व सर्व शाखा प्रमुख हे हजर होते. ज्यात उच्च दर्जाचे सिसिटीव्ही कॅमेरे, फ्लड लाईट प्रणाली, लाईव्ह मॉनेटरिंग, पब्लीक ॲड्रेस सिस्टम तसेच लाईव्ह स्ट्रिमींगची सुविधा उपलब्ध आहे. या आधुनिक वाहनांच्या समावेशामुळे जालना जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम, सुरक्षित व तंत्रज्ञानसक्षम होण्यास निश्चीतच मदत होणार असल्यास विश्वास पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी व्यक्त केला.

## हिंगोलीत किरकोळ कारणावरून दोघांवर चाकूने वार

### जीवे मारण्याचा प्रयत्न, ५ जणांवर गुन्हा दाखल

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली शहरातील हरणचौक भागात किरकोळ कारणावरून दोघांवर चाकूने वार करून तसेच लोखंडी रॉडने मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पाच जणांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात शनिवारी ता. ७ रात्री गुन्हा दाखल झाला आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली शहरातील तलाबकट्टा भागातील सय्यद वसीम यांचा अब्बास कुरेशी याच्यासोबत किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यानंतर सय्यद वसीम हे शुक्रवारी ता. ६ शहरातील हरण चौक भागात आले असतांना पेन्शनपुरा भागातील अब्बास कुरेशी, महेफुज कुरेशी, शेख आदील कुरेशी, जुनेद कुरेशी, शोएब कुरेशी हे पाच जण त्या ठिकाणी आले. त्यांनी सय्यद वसीम यांच्या सोबत पुन्हा वाद उकरून काढला. शाब्दिक चकमकी नंतर हाणामारीला सुरुवात झाली.

या हाणामारीत अब्बास कुरेशी याने लोखंडी रॉडने सय्यद वसीम यास मारहाण केली तसेच इतरांनी त्यांच्या हातातील चाकूने सय्यद वसीम यांच्या डोक्यात वार केले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर सय्यद वसीम यांचे भाऊ सय्यद कलीम हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनाही पाच जणांनी लोखंडी रॉडने मारहाण केली तसेच त्यांच्यावर चाकूने वार केले. या मारहाणीत सय्यद वसीम व सय्यद कलीम हे दोघे गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात एकच गोंधळ निर्माण झाला होता. या घटनेची माहिती मिळताच हिंगोली शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक संदीप मोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक संजय मार्के, जमादार अशोक धामणे, शेख मुजीब, संतोष करे, गणेश लेकुळे, ठोंबरे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. या मारहाणीत जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी सय्यद वसीम यांच्या तक्रारीवरून वरील पाच जणांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## सिल्लोडमध्ये मयत मतदारांच्या नावाने मतदानाचा प्रयत्न

### डोंगरगावात दोन बोगस मतदारांना रंगेहात पकडले, संशयित पोलिसांच्या स्वाधीन

सिल्लोड। प्रतिनिधी

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शनिवारी मतदान सुरू असताना सिल्लोड तालुक्यातील डोंगरगाव सर्कलमध्ये लोकशाहीला काळिमा फासणारा प्रकार समोर आला आहे. मयत मतदारांच्या नावावर बोगस मतदान करण्याच्या उद्देशाने आलेल्या दोन संशयित व्यक्तींना रंगेहात पकडण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे हा गैरप्रकार उघडकीस आला असून, या घटनेमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

डोंगरगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये शनिवारी दुपारच्या सुमारास मतदान प्रक्रिया सुरू होती. यावेळी दोन व्यक्ती मतदान केंद्रावर आल्या आणि त्यांनी मयत असलेल्या मतदारांच्या नावाने मतदानाची चिठ्ठी सादर केली. केंद्रावर उपस्थित असलेल्या भाजपाचे डोंगरगाव मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लु यांना या व्यक्तींच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. त्यांनी तत्काळ या प्रकाराला आक्षेप घेत त्या व्यक्तींना जाब विचारला असता त्यांचे बिंग फुटले. मोरेल्लु यांनी प्रसंगावधान राखत या दोन्ही बोगस मतदारांना पकडले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले.

राज्यात भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेची महायुती असली, तरी सिल्लोड तालुक्यात शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांच्यात विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे. याआधी नगरपालिका निवडणूक, आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक दोन्ही पक्ष एकमेकांविरोधात लढत आहेत. डोंगरगाव सर्कलमध्ये माजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्या गटाचे रामदास पालोदकर (शिवसेना - शिंदे गट) आणि भाजपाचे मच्छिंद्र पालोदकर यांच्यात थेट आणि चुरशीची लढत होत आहे.

दोन्ही बाजूंनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्याने मतदानाच्या दिवशी मोठा राडा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. त्यातच आता बोगस मतदानाचा प्रकार समोर आल्याने सत्तार गटावर विरोधकांकडून टीकेची झोड उठवण्यात येत आहे. दोन बोगस मतदार पकडले गेल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी याप्रकरणी तातडीने हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली आहे.

मात्र, लोकशाहीच्या या पवित्र उत्सवात मयत मतदारांच्या नावे मतदान करण्याचे धाडस करणाऱ्यांच्या मागे सूत्रधार कोण? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. या संशयितांवर पोलीस कठोर फौजदारी गुन्हा दाखल करतात की नाही आणि निवडणूक आयोग या केंद्राबाबत काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## निवडणुकीसाठी १५८ बसेस गेल्याने लांब पल्ल्याच्या प्रवाशांची कसरत

### बसस्थानकातून सायंकाळी ५.३० ची पुणे, ६.१५ ची भिवंडीसह शालेय फेऱ्या रद्द

धाराशिव। प्रतिनिधी

शनिवारी मतदानासाठी मतदान केंद्रावरील मतपेट्यांसह कर्मचाऱ्यांना आणण्यासाठी एसटीच्या १५८ एसटी बस गेल्याने दुपारी ४ नंतर काही फेऱ्या बंद कराव्या लागल्या. शनिवारी मतदानासह शासकीय कार्यालयांना सुटी असल्याने धाराशिव बसस्थानकात शांतता होती. काही प्रवाशांची वर्दळ असली तरी दररोजच्यासारखी गर्दी दिसत नव्हती.

धाराशिव बसस्थानकातून शनिवारी सायंकाळी साडेपाचची धाराशिव-पुणे, ६.१५ ची धाराशिव-भिवंडीसह दुपारी तीनची धाराशिव-उजनी, सायंकाळी साडेसातची धाराशिव-बामणी बस रद्द झाल्याने एसटी प्रवाशांची तारांबळ उडाली. परंतु दुपारपासूनच बसस्थानकात वारंवार प्रवाशांना ज्या बसेस धावतणार नाहीत, अशा सूचना दिल्याने प्रवाशांनी आपली व्यवस्था केली. परंतु भिवंडी, पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांना मात्र बस बदलत जावे लागले. तर उमतगा आगारातील सर्व बसेस मतपेट्या पोहोचवून परतल्याने विविध मार्गाचे नियोजन केले होते. केवळ शालेय फेऱ्या बंद करून नियोजन केले होते. तर लोहारा आगारात सात मुक्कामी बसेस मतपेट्या पोहचवून पुन्हा आहे त्या गावात रात्री उशीराने पोहचल्या आहेत. त्यामुळे आज सकाळपासून दररोजच्या वेळापत्रकानुसार या सर्व बससे धावणार आहेत. कळंब आगरातील काही मोजक्याच बस बंद केल्या होत्या. मतदानाच्या दिवशी दुपारपर्यंत सर्व आगारातील वाहतूक सुरू होती, असे वाहतूक नियंत्रक अजय पाटील यांनी सांगितले. परंतु लांब पल्ल्याच्या काही बसफेऱ्या रद्द झाल्याने प्रवाशांना नियमित दरापेक्षा अधिक भाडे देऊन खासगीतून प्रवास करावा लागला.

बस बदलत जावे लागत असल्याने अडचण धाराशिव बसस्थानकातून शनिवारी सायंकाळी ६.१५ ची धाराशिव-भिवंडी ही बस सुटलीच नाही. त्यामुळे धाराशिवरून बार्शीला जावे लागेल. शेवटी बस कधी सुटणार? डायरेक्ट भिवंडीला बस नसल्याने बस बदलतच जावे लागले. मतदानाला आले पण मोठी अडचण झाली मतदानासाठी गावाकडे आले होते. बस नेहमी असतेच म्हणून आले. परंतु शुक्रवारी अचानक धाराशिव-भिवंडी एसटी बस न धावल्याने शेवटी रेल्वेने जाण्याचा निर्णय घेतला. धाराशिव बसस्थानकातून भिवंडीला जाणारी सायंकाळची ६.१५ ची एकच बस आहे. मी आजारी असल्याने मी मतदानासाठी आले खरी. परंतु आजारी असल्याने मतदान महागात पडले.

## शाच्या वादातून २० वर्षीय मुलाचा गळा आवळून खून

### कारमध्ये मृतदेह आणून पेवा येथील विहिरीत टाकला

मंठा। प्रतिनिधी

पैसे देवाण-घेवाणीच्या वादातून वीसवर्षीय मुलाचा गळा आवळून खून करण्यात आला. त्यानंतर त्याचा मृतदेह मंठा तालुक्यातील पेवा येथील विहिरीत टाकण्यात आला. अथर्व गणेश लोखंडे (२०, मरकळ, ता. खेड, जि. पुणे) असे मृताचे नाव आहे.किसन ऊर्फ कृष्णा राजाराम धोजे (३५, चालक, आडगाव तांडा, ता. जिंतूर, जि. परभणी ह. मु. काळजेवाडी चाहोरली खुर्द, ता. हवेली, जि. पुणे) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी तपास चक्रे फिरवून, अनोळखी मयताची ओळख पटवली. सदर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेऊन आरोपीला ताब्यात घेतले. पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून यातील मयतास दहा लाख रुपये देण्याचा बहाणा सांगून त्याच्याकडील कारने मयतास पेवा शिवारात आणले. दोरीच्या साह्याने गळा आवळून खून करून त्याचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने वरील पद्धतीने पेवा शिवारातील विहिरीमध्ये टाकून दिल्याची कबुली दिली आहे. या प्रकरणात दुसरा आरोपी कर्नाटक राज्यातून मंठा पोलिस पथकाने ताब्यात घेतला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास फौजदार संतोष माळगे व पोलिस अंमलदार संतोष बनकर करीत आहेत.

## परभणीच्या राणी सावरगावात आयडी व्होटर दाखवण्यावरून वाद

### महंत राधाकृष्ण स्वामी अन्? निवडणूक अधिकाऱ्यांत हमरीतुमरी

परभणी। प्रतिनिधी

परभणीच्या गंगाखेड तालुक्यातील राणी सावरगाव येथील एका मतदान केंद्रावर शनिवारी सकाळी महंत राधाकृष्ण स्वामी व मतदान केंद्र अधिकारी यांच्यात वाद झाल्याची घटना घडली. मतदान ओळखपत्र दाखवण्याच्या किरकोळ मुद्यावरून हा वाद झाला. पण यामुळे येथे काहीकाळ तणाव निर्माण झाला होता.


राज्यात आज १२ जिल्हा परिषदा व १२५ पंचायत समित्यांसाठी शांततेत मतदान सुरू आहे. अनेक मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांनी रांगा लावल्या आहेत. त्यात काही वादाच्याही किरकोळ घटना घडत आहेत. असाच एक प्रकार परभणीच्या राणी सावरगाव येथील मतदान केंद्रावर घडला. येथे महंत राधाकृष्ण स्वामी व निवडणूक अधिकाऱ्यांत मतदान ओळखपत्र दाखवण्याच्या मुद्यावरून चांगलाच वाद झाला. यामुळे या मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया काहीकाळ रखडली होती. पण वेळीच हा वाद मिटल्यानंतर ही प्रक्रिया पुढे सरकली. यासंबंधीच्या माहितीनुसार, महंत राधाकृष्ण स्वामी आज मतदानासाठी संबंधित मतदान केंद्रावर गेले होते. तिथे अधिकाऱ्यांनी ओळख पटवण्यासाठी त्यांच्याकडे अधिकृत ओळखपत्र सादर करण्याची सूचना केली. त्यांना आधार कार्ड किंवा मतदान ओळखपत्र किंवा निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार इतर कोणताही वैध पुरावा दाखवण्याची सूचना करण्यात आली. पण त्यांच्याकडे त्यावेळी एकही ओळखपत्र नव्हते. त्यामुळे त्यांनी आपल्या मोबाईलमधील छायाचित्र दाखवण्याचा प्रयत्न केला. पण निवडणूकी आयोगाच्या नियमानुसार मोबाईल मतदान केंद्रात नेण्यास मनाई आहे.

## बिबटे स्थलांतरासाठी तांत्रिक समितीची मंजुरी, प्रत्यक्ष स्थलांतरास मिळेना मुहूर्त

### स्थानिक प्रशासनासमोर पेच, पत्रव्यवहार करूनही मिळेना परवानगी

अहिल्यानगर

बिबट्यांचा उपद्रव वाढल्यानंतर स्थानिक पातळीवर बिबट्यांना ठार करा, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरते आहे, परंतू, पकडलेल्या बिबट्यांच्या स्थलांतरावर वरिष्ठ स्तरावरून निर्णय घेण्यात दिरंगाई होत आहे. त्यामुळे स्थानिक वनविभाग प्रशासन पेचात सापडले आहे. बिबटे स्थलांतरासाठी तांत्रिक समितीने मंजुरी दिली आहे. परंतु प्रत्यक्षात बिबटे स्थलांतरास अद्याप मुहूर्त मिळाला नाही. पकडलेल्या बिबट्यांच्या स्थलांतरासाठी प्रस्ताव पाठवला. त्यामुळे पुन्हा स्मरणपत्र दिले आहे.



कोणत्याही व्यवस्थेशिवाय बिबटे सांभाळणे आव्हानात्मक आहे. मागील दीड ते दोन महिन्यांत सुमारे २९ बिबटे जेरबंद केले आहेत. नोव्हेंबर २०२५ पासून मानवी वस्तीवर बिबट्याचा वावर वाढल्याच्या अनेक घटना समोर आल्या. त्यात लहान मुलांसह, वृद्ध व महिलांना प्राण गमवावे लागले.स्थानिक पातळीवर हल्लेखोर बिबट्यांना ठार करण्याची मागणी सुरू झाल्यानंतर वनविभागाने कोपरगावात बिबट्याला ठार केले. तर कर्जुने-खारे येथील हल्लेखोर बिबट्या जेरबंद केला. बिबट्यांचा सुळसुळाट रोखला नाही,तर हल्ले सुरूच राहतील. त्यामुळे पकडलेले बिबटे निसर्गात मुक्त न करता निवारा केंद्रांत पाठवण्याची परवानगी अहिल्यानगर वनविभागाने तीन महिन्यांपूर्वीच मागितली.

वरिष्ठ स्तरावर, अंतिम परवानगी मिळाली नाही. उलट आतापर्यंत जेरबंद झालेल्या बिबट्यांची संख्या वाढतच चालली आहे.वनतारा अथवा इतर सुरक्षीत ठिकाणी स्थलांतरण होत नसल्याने, वनविभागासमोर पेच निर्माण झालाआहे. वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय संथ कारभार स्थानिक प्रशासनाची कोंडी करणारा ठरत आहे. महिनाभरापूर्वी प्रमुख वन्यजीव रक्षकांच्या, तांत्रिक समितीनेही बिबटे निवारा केंद्रात पाठवण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे प्रस्तावही पाठवले जात आहेत.परंतू, आजतागायत प्रत्यक्षात स्थलांतरण झाले नाही. स्थानिक पातळीवर कोणतेही रेस्क्यू सेंट्रल नाही. दरम्यान, यावर वनविभागाकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.कोपरगाव, श्रीरामपूरसह राहुरीत जेरबंद झालेले बिबटे राहुरीतील एका नर्सरीत ठेवले जातात. परंतू, आता येथेही मुक्कामी असलेल्या बिबट्यांची संख्या वाढली आहे. अशा स्थितीत आता कोपरगाव व श्रीरामपूरचे बिबटे टाकळी ढोकेश्वर अथवा इतर नर्सरीत पाठवावे लागत आहेत. बिबटे स्थलांतरावर अंतिम निर्णय नझाल्यास इतर नर्सरी हाऊस फुल्ल होतील.जिल्ह्यात बिबट्यांची संख्या मोठी आहे, याबिबिट्यांना ठेवण्यासाठी यापूर्वी अहिल्यानगर जिल्ह्यात ८० बिबटे ठेवता येतील, असे निवारा केंद्र उभारण्यास मंजुरी होती. पण आता त्यातवाढ करून ती २०० बिबट ठेवण्या इतकी क्षमता वाढवण्याचा निर्णय झाला. हा प्रस्ताव नागपूरमार्गे,सदस्य सचिव सेंट्रल झू ऑथिरिटीकडे मंजुरीसाठी पोहोचला आहे. मंजुरी मात्र अद्याप मिळाली नाही. जिल्हाभरातील सुमारे ७०० गावांत बिबट्यांचा वावर आहे. दररोज कुठेना कुठे बिबट्या दिसल्याचा दावा केला जातो. त्यानंतर पिंजरे लावण्याची धावपळ सुरू होते. मागील दिड महिन्यांत जिल्ह्यात सुमारे २९ उपद्रवी बिबट्यांना वनविभागाने जेरबंद केले आहे. वर्षभरात सुमारे ११ जणांचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. गंभीर जखमींचा आकडा २४ वर पोहोचला आहे. त्यातच महावितरणकडून पुन्हा एकदा, रात्रीची वीज सुरू करण्यात आली. त्यामुळे बिबट्यांचे हल्ले वाढण्याची भिती व्यक्त होत आहे.

## मुद्देमाल कक्षातून ९ कोटींचे अल्प्रझोलम गायब

### अहिल्यानगरच्या तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

अहिल्यानगर। प्रतिनिधी

केंद्रीय मुद्देमाल कक्षात साठवून ठेवलेल्या अंमली पदार्थांच्या साठ्यातून तब्बल ९ कोटी रुपयांहून अधिक किमतीचा 'अल्प्रझोलम' हा पदार्थ चोरून त्याऐवजी मैद्याची भेसळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचा पोलिस हवालदार शामसुंदर विश्वनाथ गुजर यांच्यावर तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी फिर्याद दिली. त्यानुसार, गुजर यांची नियुक्ती एनडीपीएस. कायद्यांतर्गत जप्त केलेल्या मुद्देमालाच्या कामकाजासाठी केली होती. श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यातीलएका गुन्ह्यातील १०.९७५ किलोवजनाचा पांढऱ्या रंगाचे स्फटिकअसलेला 'अल्प्रझोलम' हा अमलीपदार्थ मुद्देमाल कक्षात जमा होता.गुजर याने या मूळ मालाचा अपहारकरून, स्वतःच्या आर्थिकफायद्यासाठी तो विकला आणिपुराव्यामध्ये फेरफार करण्यासाठी त्यापोत्यात मैद्याचे पीठ भरले.पुणे ग्रामीण पोलिसांनी गुजर यालाएका गुन्ह्यात अटक केल्यानंतर हासर्व काळाबाजार समोर आला. त्यामुळे पोलिस अधीक्षकांनीनेमलेल्या तपास समितीने यासाठ्याची पडताळणी केली असता,तब्बल ९ कोटी ९ लाख ७५ हजाररुपयांच्या मुद्देमालाचा अपहारझाल्याचा अहवाल दिला.

या गंभीरकृत्यानुसार गुजर याच्यावरफसवणूक व विश्वासाघाताचा गुन्हानोंदवण्यात आला आहे. पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, अंमली पदार्थ तस्करीमध्ये प्रत्यक्ष सहभाग आणि मुद्देमालाच्या अपहाराचा गंभीर ठपका ठेवत हवालदार शामसुंदर गुजर याला भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३११(२) (ब) मधील तरतुदीनुसार शासन सेवेतून तातडीने बडतर्फ केले आहे.

# आष्टी तालुक्यात 'पांढऱ्या विषाचा' विळखा

## अन्न व औषध प्रशासनाच्या डोळेझाक पणावर संताप

आष्टी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचा मुख्य पूरक व्यवसाय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दूध व्यवसायाला आष्टी तालुक्यात भेसळीचे ग्रहण लागले आहे. दुधाचे दर वाढल्याने नफेखोरीसाठी काही संकलन केंद्रे आणि उत्पादक मानवी जीवाशी खेळत आहेत. ''अधिकाऱ्यांनो, हेच दूध तुमच्या मुलांना पाजाल का?'' असा संतप्त सवाल आता सामान्य नागरिक विचारत आहेत. या प्रकरणाची तक्रार थेट मुख्यमंत्र्यांकडे करण्याची तयारी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

आष्टी तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुधाचे उत्पादन होते. दररोज लाखो लिटर दूध हे विविध संघांना पुरवले जाते. दूध उत्पादनाच्या बाबतीमध्ये आष्टी तालुका हा मराठवाड्यात अग्रेसर असल्याचे बोलले जाते. कोरोनाच्या काळात आणि कोरोना नंतर दुधाचे भाव गडगडले असताना हा व्यवसाय मडकळीस आला होता. परंतु दूध उत्पादक शेतकऱ्यांनी हा व्यवसाय मोठ्या प्रयत्नाने आणि आर्थिक नुकसान सहन करूनही टिकून ठेवला होता. सध्या दुधाला चांगला दर मिळत असल्याने शेतकऱ्याचा आर्थिक फायदा होत आहे. परंतु गेल्या काही दिवसापासून आष्टी तालुक्यामध्ये दूध भेसळीने डोके वर काढले आहे. दुधाचे दर वाढल्यामुळे अधिक नफा मिळवण्याच्या हव्यासापोटी आष्टी तालुक्यात दुधात मोठे भेसळ होत आहे. त्याचबरोबर भेसळीचे साहित्य खुलेआम विकले जात आहे. दुधाची फॅट आणि डिग्री वाढवण्यासाठी घातक रसायनांचा वापर केला जात असल्याची चर्चा सर्वत्र आहे. कोरोना काळात अडचणीत आलेला दूध व्यवसाय आता सावरत असताना, अशा भेसळखोरांनी आपला भेसळीचा धंदा थाटला आहे. अशा भेसळखोरांमुळे इमानदार दूध उत्पादकही बदनाम होत आहे.

दुधातील भेसळ आणि मानवावर होणारे परिणाम

दुधात केवळ पाणी मिसळले तर ते आर्थिक नुकसान आहे, परंतु नैसर्गिक दूध भासण्यासाठी दुधातील नायट्रोजनची पातळी वाढवून प्रोटीन जास्त दाखवण्यासाठी युरियाचा वापर होतो. यामुळे किडनीवर गंभीर परिणाम होतात. दुधातील फॅट टिकवून ठेवण्यासाठी आणि सायीचा थर जाड करण्यासाठी डिटर्जंट वापरले जाते. यामुळे पोटाचे विकार आणि आतड्यांना सूज येते. दूध जास्त वेळ टिकवण्यासाठी (प्रिझर्व्हेटिव्ह म्हणून) हायड्रोजन पेरॉक्साईड वापर होतो. हे शरीरासाठी अत्यंत विषारी आहे. ग्लुकोज, युरिया, रिफाईंड तेल आणि डिटर्जंट एकत्र करून हुबेहूब दुधासारखा पदार्थ बनवला जातो, जो कर्करोगाला निमंत्रण देणारा ठरतो.

### प्रशासनाचे 'आशीर्वाद' की दुर्लक्ष?

आष्टी तालुक्यात यापूर्वी अनेक कारवाया झाल्या, अनेकांना अटकही झाली. मात्र, त्या प्रकरणांचे पुढे काय झाले? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. अन्न व औषध प्रशासनाचे () अधिकारी या गंभीर प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. ''आष्टीतील दूध भेसळीचा हा काळा धंदा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी आम्ही लवकरच निवेदन देणार आहोत. भेसळखोर आणि त्यांना पाठीशी घालणारे अधिकारी यांच्यावर कडक कारवाई होणे गरजेचे आहे.'' असे एका सामाजिक कार्यकर्ता नाव न छापण्याच्या अटीवर आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.

### काय आहे कायदा

दूध भेसळ हा अजामीनपात्र आणि गंभीर गुन्हा आहे. याविरोधात भारतात कडक कायदे आहेत. (अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६) या कायद्यानुसार भेसळयुक्त अन्न विकणे हा गुन्हा आहे. भेसळीच्या तीव्रतेनुसार ६ महिने ते जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे. भेसळीमुळे ग्राहकाच्या आरोग्याला इजा पोहोचल्यास ५ लाख रुपयांपर्यंत दंड आणि गंभीर दुखापत किंवा मृत्यू झाल्यास १० लाखांहून अधिक दंड व कारावास होऊ शकतो. कलम २७२ व २७३ () अंतर्गत खाद्यपदार्थात भेसळ करणे आणि अपायकारक अन्न विकणे यासाठी भारतीय दंड संहितेनुसार कठोर शिक्षेची तरतूद आहे.

# प्रभू वैद्यनाथाच्या बारी मंडपाचे काम रखडले

## यंदाच्या महाशिवरात्रीत उत्तर पायऱ्यांवरच भाविकांच्या रांगा

बीड । प्रतिनिधी

परळीतील वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील दर्शन बारी मंडपाचे काम गेल्या चार वर्षांपासून रखडल्याचं दिसून येतंय. त्यामुळे यंदाच्या महाशिवरात्रीलाही वैजनाथ मंदिराच्या उत्तर पायऱ्यांवरच भाविकांच्या रांगा लागणार आहेत. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीचा सण असल्याने परळीतील वैजनाथ मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे.

परळीतील वैजनाथ मंदिर परिसरात गेल्या चार वर्षापासून सुरू असलेल्या दर्शन बारी मंडपाचे काम आता रखडलेले आहे. चार वर्षाआधी वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून साधारण २० कोटी रुपये खर्च करून या दर्शन बारी मंडपाच्या बांधकामाला सुरुवात झाली. त्यावेळी ही इमारत दीड वर्षात होणे अपेक्षित होते असे असतानाही चार



वर्षे उलटूनही दर्शन बारी मंडपाचे काम रखडलेले आहे.

कोट्यवधी रुपये खर्च करुनही दर्शन बारी मंडपाचे काम रखडल्याने यंदाच्या महाशिवरात्रीतही मंदिराच्या उत्तर पायऱ्यांवरच भाविकांच्या दर्शन रांगा असणार आहेत. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील रखडलेल्या या दर्शन बारी मंडपाचे काम कधी पूर्ण होणार याकडे सर्वांचे लक्ष लागलेलं आहे.वैजनाथ मंदिरातील गर्दी वाढल्यास मंदिराच्या उत्तर पायऱ्यांवर भाविकांच्या रांगा लावण्यात येतात. भाविकांच्या या रांगा दर्शन बारी मंडपातून लावण्यात येणार होत्या. त्याकरता वैजनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून दर्शन बारी मंडप उभारण्यात आला आहे. यात एकूण चार मजले, अद्यावत लिफ्ट अशी या दर्शन बारी मंडपाची रचना करण्यात आलेली आहे. दर्शन मंडपात एकाच वेळी साधारण पंचवीस हजार भाविक रांगेत राहू शकतात.

# गुरू-शिष्य परंपरेतूनच विश्वात्मक कल्याण साध्य होते -सुश्री अन्नपूर्णा भारतीजी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारत हा गुरू परंपरेवर विश्वास ठेवणारा, त्यांना मानणारा असून गुरू-शिष्य परंपरेतूनच विश्वात्मक कल्याण साध्य होते. अर्थातच श्रद्धा, विश्वास, विनम्रता व शालीनता शिष्यात असणे आवश्यक असून अशा सदाचारी व्यक्तीला गुरूवर्य योग्य मार्ग दाखवून त्याचे कल्याण करतात असे विचार प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांचे कृपापात्र शिष्या सुश्री अन्नपूर्णा भारतीजी यांनी व्यक्त केले.

दिव्य ज्योति जागृति संस्थान भवन, शंकरपार्वतीनगर परळी वैजनाथ येथे रविवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी दिव्य ज्योति जाग्रति संस्थानच्या वतीने अध्यात्मिक प्रवचन व भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले



होते. याप्रसंगी प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री अन्नपूर्णा भारतीजी बोलत होत्या. कार्यक्रमस्थळ भक्तांनी आकर्षकरित्या सजविल्याने आनंदी व भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. परिसरात रांगोळी काढून आणि सुशोभिकरण केल्याने वातावरण प्रसन्न दिसत होते. प्रवेशद्वारालाच प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांचे आकर्षक स्वरूप एका सुंदर मंदिरात दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. या मंदिरापुढेही आकर्षकरित्या काढलेली रांगोळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती.

आपल्या सत्संग कार्यक्रमातून सुश्री अन्नपूर्णा भारतीजीनी गुरू कोण असावा ? यापासून शिष्यापर्यंतची संपूर्ण व्याख्या अतिशय सहजतेने व विविध उदाहरणासह स्पष्ट केले. त्या म्हणाल्या की, मनुष्य जीवनाचे लक्ष ईश्वर प्राप्ती आहे व हे बिना सद्गुरू शिवाय प्राप्त करता येत नाही ईश्वर साक्षात्कार करून देणाऱ्या गुरूंची गरज आहे . गुरू सेवा ही सर्वश्रेष्ठ असून ही सेवा श्री ◀◀ पान २ वर

# विवाह सोहळ्यात अनोखा व प्रेरणादायी उपक्रम

आष्टी । प्रतिनिधी

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सोशल फार्मचे संस्थापक अध्यक्ष यशवंत खंडागळे यांचा मुलगा ऋषिकेश तर भाऊसाहेब वामन राजपूत यांची कन्या अनुराधा यांचा विवाह सोहळा खाकळवाडी शेरी जवळील अंबिका लॉन्स येथे रविवारी दुपारी ३ वाजता आमदार सुरेश आण्णा धस यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या विवाह सोहळ्यास मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या युवा सोहळ्यामध्ये सर्व सत्काराला फाटा देऊन सोशल फोरमचे अध्यक्ष यशवंत खंडागळे यांनी आलेल्या मान्यवरांना भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यघटनेची पुस्तिका भेट देऊन सन्मान केला. त्यांच्या या अनोख्या उपक्रमाचा इतरांनी देखील बोध घ्यावा



असे अवांतर खर्च टाळून इतरांनी देखील विवाह सोहळ्यामध्ये पुस्तक रुपी भेट द्यावी अशी भावना आमदार सुरेश धस यांनी या विवाह सोहळ्यामध्ये वधूवरांना आशीर्वाद देताना व्यक्त केली. यांच्या विवाह सोहळ्यात एक अनोखा व विचारप्रवर्तक उपक्रम राबवला. या मंगल प्रसंगी त्यांनी आलेल्या मान्यवरांचे सत्कार घटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाची पुस्तिका भेट देऊन केले.

विवाहासारख्या ◀◀ पान २ वर



**बीड : राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर बारामती येथे भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, पार्थदादा पवार यांची भेट घेऊन सांत्वन केले. तसेच, दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.**

# अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वार ठार

## नाक्यावर कुठलीही सुविधा नसल्याने एकाचा गेला बळी

बीड । प्रतिनिधी

बीड पासून जवळच असलेल्या पाडळशिंगी टोल नाक्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेने एका दुचाकी स्वराचा मृत्यू झाला. त्याला रुग्णालयात नेण्यासाठी ॲम्बुलन्स नसल्याने त्याचा जीव वाचवता आला नाही.एरव्ही दहा ते बारा पोलीस कर्मचारी या ठिकाणी असतात मात्र या व्यक्तीचा जीव गेला तेव्हा कोणीही नव्हते. असे प्रत्यक्ष दर्शींनी सांगितले.

बीड गेवराई रस्त्यावर असलेल्या टोल नाक्यावर यापूर्वी अनेक अपघात घडलेले आहेत. मात्र त्याची फारशी दखल घेतली जात नाही. टोलनाके फक्त टोल वसुलीचे काम करतात. त्यांना बाकी काही देणे घेणे नसते. वास्तविक पाहता या ठिकाणी ॲम्बुलन्स असणे गरजेचे आहे. मात्र तीही व्यवस्था या ठिकाणी नाही. या ठिकाणी पोलीस चौकी आहे. दहा ते बारा पोलीस कर्मचारी या ठिकाणी असतात. मात्र ज्यावेळी हा अपघात झाला त्यावेळी एकही कर्मचारी या ठिकाणी नव्हता. असे प्रत्यक्षदर्शी सांगतात. जर या ठिकाणी ॲम्बुलन्स असती तर कदाचित या तरुणाचा जीव वाचला असता. मात्र सुविधा नसल्यामुळे एकाचा बळी गेला. यापूर्वी अनेक लोकांचे बळी या ठिकाणी गेलेले आहेत. मात्र प्रशासन याची दखल घ्यायला तयार नाही. या ठिकाणी ॲम्बुलन्स व्यवस्था करावी अशी मागणी केल्या अनेक दिवसांपासून केली जात आहे. मात्र त्याची दखल घेतली जात नाही या ठिकाणी ॲम्बुलन्स व्यवस्था झाली नाही तर तीव्र आंदोलन छेढण्याचा इशारा प्रवाशांनी दिला आहे.

# माता रमाई यांच्या जीवनातून संघर्ष व त्यागाची प्रेरणा घ्यावी डॉ. प्रतिभा जाधव

## तुलसी शैक्षणिक समूहात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

माता रमाई आंबेडकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शिक्षण आणि समाजकार्यासाठी भक्कम पाठबळ दिले. त्यांच्या त्याग, संयम आणि समर्पणामुळेच बाबासाहेबांना समाज परिवर्तनाचे महान कार्य करता आले. माता रमाई यांच्या जीवनातून संघर्ष, त्याग आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा घेणे आजच्या



पिढीसाठी अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध वक्त्या डॉ. प्रतिभा जाधव यांनी केले.

तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शनिवार दि. ७ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे होते. तर, प्रमुख पाहुणे म्हणून मा.निलेश कदम, प्रा.डी.डी.राऊत, प्रा.डी.जी.निकाळजे, डॉ.अश्विनी बेद्रे व प्रा.प्रकाश ढोकणे उपस्थित होते. डॉ.जाधव यांनी आपल्या व्याख्यानात माता रमाई आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत ◀◀ पान २ वर

# विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत पॉलिटेक्निक आष्टीचा सलग तीन वर्षांचा हॅटट्रिक विजय; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

कडा । प्रतिनिधी

आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, पॉलिटेक्निक आष्टी या महाविद्यालयाच्या व्हॉलीबॉल संघाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित -१ झोन विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सलग तीन वेळा विजेतेपद पटकावत ऐतिहासिक हॅटट्रिक विजय नोंदविला आहे. या दैदीप्यमान यशाच्या जोरावर आनंद चॅरिटेबल संस्था संचलित डिप्लोमा इन इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी



(पॉलिटेक्निक) आष्टीच्या संघाची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

या विभागीय स्पर्धेत पॉलिटेक्निक आष्टीच्या संघाने प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट खेळ, संघभावना, शिस्त व तांत्रिक कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन केले. अंतिम सामन्यात बलाढ्य प्रतिस्पर्धी संघावर मात करत संघाने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले.

या विजयी १२ खेळाडूंच्या संघाचे नेतृत्व संघनायक ढोले श्रेयश परशुराम यांनी प्रभावीपणे केले. संघात कदम ओंकार अविनाश,शेख नुमान निसार, मुरकुटे गौरव सचिन, मिसाळ ज्ञानेश्वर रामदास, जैदी आमेर इस्लाम, खान साद याह्या, भालेराव महेश विष्णू, मिसाळ शत्रुघ्न मच्छिंद्र, पोकळे युवराज नारायण, मुरकुटे श्रीनाथ संतोष व मिर्झा शोएब आसिफ बेग यांनी उल्लेखनीय कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. संघाच्या या यशामागे क्रीडा प्रशिक्षक प्रा. योगेश पवार यांचे ◀◀ पान २ वर

# खंडोबा दिपमाळ मंदिरातील ऐतिहासिक दिपमाळेच्या दुरुस्तीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात

## सतराव्या शतका नंतर पहिल्यांदाच दुरुस्ती रामनाथ खोड

बीड । प्रतिनिधी

शहरातील श्री खंडोबा दिपमाळ मंदिरातील ऐतिहासिक दिपमाळेच्या दुरुस्तीच्या कामाला अखेर प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. अनेक वर्षांपासून पावसाळा, ऊन तसेच काळाच्या ओघात ही दिपमाळ मोठ्या प्रमाणात जीर्ण झाली होती. दगडी अणि जुन्या विटाच्या बांधकामात तडे जाऊ



लागल्याने भाविकांसह नागरिकांमध्ये या ऐतिहासिक वास्तूच्या सुरक्षिततेबाबत चिंतेचे वातावरण ◀◀ पान २ वर

''बीड शहराला समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. येथे पाऊलोपाऊली इतिहासाच्या खुणा आढळून येतात. हा वारसा जपणे ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येक बीडकराची सामूहिक जबाबदारी आहे. अशा ऐतिहासिक वास्तू आपल्या शहराची ओळख देश-विदेशात करून देतात. मात्र आज या वास्तूंकडे दुर्लक्ष करून आपणच आपल्या शहराची ऐतिहासिक ओळख हळूहळू पुसण्याचे काम करत आहोत. वेळेत संवर्धन केले नाही, तर पुढील पिढ्यांना हा इतिहास फक्त पुस्तकांतूनच पाहावा लागेल. त्यामुळे अशा ऐतिहासिक वास्तूंचे शास्त्रीय पद्धतीने संवर्धन व संरक्षण करणे ही काळाची गरज असून त्यासाठी प्रशासनासह नागरिकांनीही सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे,'' असे मत रामनाथ खोड (विश्वस्त, श्री खंडोबा दिपमाळ मंदिर) यांनी व्यक्त केले.

रामनाथ खोड, कोषाध्यक्ष- श्री खंडोबा दिपमाळ मंदिर बीड

# थकीत देयके निकाली काढा- वाव्हळ

बीड । प्रतिनिधी

मागिल काही वर्षांपासून प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांचे थकीत देयके निधी अभावी शासनाने निकाली काढले नाहीत. या थकीत बिलासाठी तत्काळ निधी उपलब्ध करून देत थकित बिले लवकरच म्हणजे या वर्षी निकाली काढावेत अशी मागणी विना अनुदानित शाळा कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केली आहे.



या बाबत अधिक माहिती अशी की बीड जिल्ह्यात गेल्या पाच ते सहा वर्षांपासून प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांचे थकीत देयके बाकी आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ही थकित देयके शासनाने निकाली काढले नाही, दरवर्षी थकीत बिल टाकले जाते सन २०२४-२५ मध्ये डायरेक्टर लेवलला गेलेले परंतु निधी अभावी बरेच बिले रिजेक्ट करण्यात आले, परत थकीत बिल टाकण्यासाठी सूचना दिल्या, सन २०२५-२६ मध्ये पुन्हा एकदा थकीत देयके सादर केली परंतु संपूर्ण महाराष्ट्रात बऱ्याच कर्मचाऱ्यांचे थकीत देयके बाकी आहेत. सर्व कर्मचाऱ्यांनी वेतन पथक कार्यालयात थकीत देयके सादर केले, संबंधित कार्यालय थकीत देयके चेक करून पुढे पाठवणार आहे, परंतु त्यांना

कालावधी कमी असल्यामुळे आम्हाला आमचे बिल रिजेक्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महापालिकेत दोन कोटींच्या साहित्यखरेदीत घोटाळा; २० अधिकारी-कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा

पुणे । प्रतिनिधी

महापालिकेत दोन कोटी रुपयांच्या साहित्यखरेदी प्रकरणात गंभीर अनियमितता उघड झाल्यानंतर प्रशासनाने संबंधितांवर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. वर्षानुवर्षे विनावापर गोदामात पडून राहिलेल्या साहित्यामुळे महापालिकेच्या निधीची अपव्यय झाल्याचे निष्पन्न झाल्याने भांडार, घनकचरा व्यवस्थापन आणि लेखा-वित्त विभागातील २० अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. यामध्ये काही निवृत्त अधिकाऱ्यांचाही समावेश असल्याने खळबळ उडाली आहे.




काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने हा प्रकार उघडकीस आणला होता. मनसेचे सरचिटणीस हेमंत संभूस यांनी संबंधित विभागांनी ठेकेदारांची बिले काढण्यासाठी घाई केली. मात्र, साहित्याचा वापर न झाल्याने सुमारे दोन कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर आयुक्त नवल किशोर राम यांनी चौकशीचे आदेश दिले होते. हेमंत संभूस यानी केलेल्या आरोपानुसार, भांडार विभागाने सन २०१५ मध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी सुमारे ७५ लाख रुपयांचे गणवेशाचे कापड तसेच ६९.७१ लाख रुपयांच्या साड्या खरेदी केल्या होत्या. संबंधित ठेकेदारांना देयके अदा करण्यात आली. मात्र, हे साहित्य गेल्या नऊ वर्षांपासून वडगाव बुद्रूक येथील सावित्रीबाई फुले अभ्यासिकेत पडून आहे. एकाही कर्मचाऱ्याला ते वितरित केले नाही. साहित्याचा वापर झाला नसतानाही ठेकेदारांची बिले वेळेत अदा केल्याने खरेदी प्रक्रियेवर संभूस यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. या प्रकरणाचा अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांनी सविस्तर चौकशी करून अहवाल सादर केला आहे. त्यानुसार संबंधित विभागांतील तत्कालीन प्रमुखांसह विविध पदांवरील अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्या आहेत. यामध्ये निवृत्त मुख्य अभियंता, सध्या कार्यरत असलेले उपायुक्त, लिपिक आणि कनिष्ठ अभियंता अशा विविध पदांवरील सुमारे २० जणांचा समावेश आहे. पुढील कारवाई फेबुवारी अखेरपर्यंत अपेक्षित असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

**कचऱ्याची दुर्गंधी कमी करणारे साहित्यही धूळ खात**

घनकचरा विभागाच्या मागणीनुसार ऑगस्ट २०२३ मध्ये ५० लाख रुपये खर्चून २० हजार किलो 'सिटी वेस्ट ट्रीटमेंट' पावडर आणि ४ हजार लिटर 'इकोचीप' लिक्विड बायोकॅटॅलिस्ट खरेदी करण्यात आले. कचऱ्याची दुर्गंधी कमी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या या साहित्याचा योग्य वेळी वापर न झाल्याने त्यातील रासायनिक घटक निष्प्रभ झाले असून, ते आता निरुपयोगी ठरले आहे.

# पुणे पोलीस भरतीला 'या' तारखेपासून सुरुवात; १.७५ लाखांहून अधिक उमेदवारांमध्ये चुरस

पुणे । प्रतिनिधी

पुणे पोलीस दलातील पोलीस भरती प्रक्रियेचा प्रारंभ १६ फेब्रुवारीपासून होत आहे. पोलीस दलातील १,६३३ पोलीस शिपाई, १०५ वाहनचालक, ३३ बँडमन अशा जागांसाठी एक लाख ३९ हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. कारागृहातील १३३ शिपायांच्या भरती प्रक्रियेत ४६ हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

भरती प्रक्रिया शिवाजीनगर पोलीस मुख्यालय, तसेच रामटेकडीतील राज्य पोलीस दलाच्या मैदानावर होणार आहे. १६ फेब्रुवारीपासून शारिरिक चाचणी सुरू होणार असून, त्यानंतर लेखी परीक्षा आयोजित केली आहे. भरती प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी पोलिसांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याची माहिती अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय पाटील यांनी दिली.

मैदानी चाचणीनंतर पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येणार असून, भरती प्रक्रियेचे वेळापत्रक टप्याटप्याने जाहीर केले जाणार आहे. अधिकृत संकेतस्थळ, संदेशाव्दारे उमेदवारांना माहिती दिली जाणार आहे. शारिरिक चाचणीत उमेदवारांची छाती, उंची मोजण्यात येणार आहे.१०० मीटर, १६०० मीटर धावणे (महिला उमेदवारांसाठी ८०० मीटर ), गोळाफेक अशा घटकांचा समावेश असणार आहे. भरती प्रक्रियेत गैरप्रकार होऊ नये म्हणून आरएफआयडी तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. संपूर्ण भरती प्रक्रिया सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली होणार आहे. त्यामुळे उमेदवारांची धावण्याची वेळ, चाचणीतील कामगिरी याची अचूक





वेळ नोंदविता येणार आहे.

भरती प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप होणार नाही, याची काळजी घेण्यात आली आहे, असे अतिरिक्त आयुक्त पाटील यांनी नमूद केले.लेखी परीक्षेच्या टप्यात विशेष उपायोजना करण्यात येणार आहे. लेखी परीक्षा घेणाऱ्या अधिकाऱ्यांना मोबाइल क्रमांक वापरण्यास मनाई केली आहे.परीक्षेच्या ठिकाणी बंदोबस्त आहे. गैरप्रकारांवर नजर ठेवण्यात येणार आहे. उमेदवारांनी मध्यस्थांच्या भूलथापांना बळी पडू नये. गैरप्रकार आढळून आल्यास त्वरीत मोबाइल क्रमांक – ७३९१०८२६११ वर संपर्क साधावा, असे आवाहन अतिरिक्त पोलीस आयुक्त संजय पाटील यांनी केले आहे.

# भिगवण पक्षीगणनेत ६,६०४ पक्ष्यांची नोंद; वाढलेल्या पाण्यामुळे फ्लेमिंगो यंदा गायब

पुणे : जागतिक पाणथळ दिनानिमित्र (भिगवण) केलेल्या वार्षकि पक्षीगणनेत १३७ प्रजातींच्या एकूण ६,६०४ पक्ष्यांची नोंद करण्यात आली आहे. पाण्याची पातळी वाढल्याने फ्लेमिंगो मात्र यावर्षी अदृश्य असल्याचे निरीक्षणात आढळून आले आहे.



वनविभाग सोलापूर आणि 'वाइल्डलाईफ रिसर्च अँड कन्झर्वेशन सोसायटी' यांच्या संयुक्त विद्यमाने १ फेबुवारी रोजी ही गणना करण्यात आली. या गणनेनुसार प्रजातींच्या ५,५५० पाणपक्ष्यांचा समावेश आहे. मात्र, यार्वर्षी धरणातील वाढीव पाणी पातळीमुळे पर्यटकांचे आकर्षण असलेले फ्लेमिंगो (रोहित) पक्षी अद्याप तरी गणनेत दिसून आलेले नाहीत. या पक्षीगणनेत पुणे आणि सोलापूर येथील २९ स्वयंसेवकांनी जलाशयाच्या ९ विविध स्थळांवर जाऊन ही निरीक्षणे नोंदवली आहेत. या गणनेतून मिळालेली माहिती 'एशियन वॉटरबर्ड सेन्सस' कडे पाठवली जाणार आहे. यावर्षी सर्वेक्षणात 'मोठा ठिपकेदार गरुड' आणि 'नदी सुरय' यासारख्या दुर्मळि पक्ष्यांचे दर्शन झाले आहे. 'ब्लॅक-टेल्ड गॉडविट' आणि 'पॅलिड हॅरियर'सारख्या संकटसदृश प्रजातींचीही नोंद करण्यात आली. उजनी जलाशय हे पक्ष्यांसाठी नंदनवन मानले जाते, जिथे दरर्वर्षी बार-हेडेड गूस, नॉर्दर्न शॉवलर आणि विविध प्रकारचे शिकारी पक्षी हजेरी लावतात. या वार्षकि गणनेमुळे येथील परिसंस्थेच्या आरोग्यावर लक्ष ठेवण्यास मदत होणार आहे. या सर्वेक्षणात १३७ प्रजातींच्या ६,६०४ पक्ष्यांची नोंद करण्यात आली आहे. उजनीसारख्या महत्त्वाच्या पाणथळ क्षेत्राचे संवर्धन आणि निरीक्षण करण्यासाठी याचा मोठा उपयोग होईल, अशी अपेक्षा पक्षीमित्रांनी व्यक्त केली आहे.

**४८० भारतीय पाणकावळ्यांचा थवा**

या पक्षी गणनेदरम्यान ४८० भारतीय पाणकावळ्यांचा एक मोठा थवा आकाशात झेपावताना दिसला असून जे या दिवसाचे मुख्य आकर्षण ठरले आहे. २०२५ मध्ये सरासरीपेक्षा जास्त पावसामुळे उजनी धरणाची पाणी पातळी यंदा अधिक आहे. फ्लेमिंगोसारख्या पक्ष्यांना अन्नाच्या शोधासाठी उथळ पाण्याची गरज असते. पाणी खोल असल्यामुळे हे पक्षी या भागात दिसून आले नाहीत. पाणी पातळी कमी होईल, तसतशी पक्ष्यांची संख्या वाढण्याची शक्यता पक्षिमित्रांनी व्यक्त केली आहे.

# बांगलादेशी तरुणीवरची कारवाई टाळली; महिला पोलिसाच्या निलंबनाचे आदेश

पुणे । प्रतिनिधी

बुधवार पेठेतील वेश्यावस्तीत बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी तरुणीवर कारवाई न करणाऱ्या फरासखाना पोलीस ठाण्यातील महिला पोलीस हवालदाराला निलंबित करण्याचो आदेश परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले यांनी दिले. बांगलादेशी तरुणीबाबतची माहिती मिळाल्यानंतर ती माहिती वरिष्ठांना दिली नाही, तसेच तरुणीकडून पैसे घेतल्याचा आरोप तिच्यावर ठेवण्यात आला आहे.

मनिषा पुकाळे असे निलंबित महिला पोलीस हवालदाराचे नाव आहे. पुकाळे फरासखाना पोलीस ठाण्यातील तपास पथकात नियुक्तीस आहेत. परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले यांनी शुक्रवारी रात्री वरील आदेश दिले आहेत.शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांवरुिद्ध कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले होते.देशात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांविरुद्ध




कारवाई करण्याचे आदेश वर्षभरापूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिले होते. त्यानंतर बांगलादेशी नागरिकांविरुद्ध कारवाई तीव्र करण्यात आली. बुधवार पेठेतील वेश्यावस्तीत २०२३ मध्ये बांगलादेशी तरुणी दलालामार्फत आली होती. त्या वेळी ती अल्पवयीन होती.वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी तरुणीने फरासखाना पोलीस ठाण्यात नुकतीच फिर्याद दिली होती.तिच्या फिर्यादीनुसार, दलाल, कुंटणखाना मालकासह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल करण्यापूर्वी बांगलादेशी तरुणी पोलीस हवालदार मनीषा पुकाळे यांनी भेटली होती. याबाबतची माहिती पुकाळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणे गरजेचे होते.

मात्र, पुकाळे यांनी वरिष्ठांना याबाबतची माहिती दिली नाही. त्यांनी तरुणीकडून पैसे घेतले होते. कायद्यानुसार बेकायदा वास्तव्य केल्याप्रकरणी तक्रारदार बांगलादेशी तरुणीविरुद्ध कारवाई करणे गरजेचे होते. मात्र, पुकाळे यांनी ही बाब वरिष्ठापासून लपवून ठेवली होती.बुधवार पेठेतील सामाजिक कार्यकर्त्यांनी ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर बांगलादेशी तरुणीची चौकशी करण्यात आली. तेव्हा हा प्रकार उघडकीस आला.

# लग्नाचे आमिष, प्रेमाचा सापळा अन् आर्थिक फसवणूक; तरुणीकडून ३.४५ लाखांचा गंडा

पुणे । प्रतिनिधी

मैत्री करून प्रेमाच्या जाळयात ओढल्यानंतर लग्नाच्या आमिषाने तरुणीसोबत वेळोवेळी शरीरसंबंध ठेवले. त्यानंतर तिचा विर्श्वास संपादन करून तिला लोन काढण्यास भाग पाडून २ लाख ७० हजार रुपये घेऊन फसवणूक केली. एवढेच नाही तर तरुणीचा ७५ हजार रुपये किमतीचा मोबाईल दोन तासांसाठी पाहिजे, असे म्हणत घेवून तो पळून गेला.

याप्रकरणी एक २६ वर्षीय तरुणीने विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी मनप्रीत सिंग केंथ उर्फ करन (वय ३५, रा. मालाड वेस्ट, मुंबई उपनगर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जून २०२५ ते ५ फेबुवारी २०२६ दरम्यान हा प्रकार घडला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी तरुणीची आणि आरोपीचा परिचय झाल्यानंतर त्याने मैत्रीच्या बहाण्याने तरुणीला आपल्या जाळ्यात खेचले. त्यानंतर लग्नाचे प्रलोभन दाखवून तरुणीसोबत शरीरसंबंध ठेवले. तसेच तरुणीचा विर्श्वास संपादन केल्यानंतर त्याने तरुणीला तिच्या नावावर फायनान्सचे लोन घेण्यास भाग पाडले.

मी त्याचे हप्ते भरतो असे सांगून आरोपीने तरुणीकडून २ लाख ७० हजार रुपये घेतले. तरुणीचा ७५ हजार रुपये किमतीचा मोबाईल देखील घेऊन आरोपी फरार झाला. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणीने याबाबत विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

# संघ-संस्कारातून सभागृहापर्यंत; स्वप्नाली पंडितांचा नगरसेविकेपर्यंतचा प्रवास



पुणे । प्रतिनिधी

वडील कट्टर हिंदुत्ववादी कार्यकर्ते होते. त्यांच्या समाजसेवेचे संस्कार माझ्यावर लहानपणीच झाले होते. लग्न झाल्यावर पती नितीन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश मंडळाच्या माध्यमातून मी नागरिकांच्या विशेषत: महिलांच्या समस्या प्राधान्याने सोडवू लागले. आमच्या कामाची दखल भाजपने घेत आम्हाला उमेदवारी दिली. या संधीचे सोने करत मी निवडून आले.आता प्रभागातील समस्या सोडवणार आहे. प्रामुख्याने कचरा व्यवस्थापन, वाहतुकीचा प्रश्न यासह महिलांच्या सुरक्षेवर भर देणार असल्याचा संकल्प भाजपच्या प्रभाग २५ शनिवार पेठ-महात्मा फुले मंडई प्रभागाच्या अ गटातून निवडून आलेल्या नगरसेविका स्वप्नाली पंडित यांनी बोलून दाखवला.

स्वप्नाली पंडित यांना भाजपचे तिकीट मिळाल्यानंतर प्रतिस्पर्धी म्हणून राष्ट्रवादीच्या रूपाली पाटील-ठोंबरे आणि मनसेच्या अमृता भोकरे या होत्या. त्यांचा पराभव करत स्वप्नाली पंडित २२ हजार ९८७ मते मिळवत विजयी झाल्या आहेत. नुकतीच त्यांनी 'पुढारी' कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्या म्हणाल्या, मी मूळची रोहा (ता. रायगड) जिल्ह्यातील. वडील हे कट्टर हिंदुत्ववादी होते. त्यांनी १९९२च्या रामजन्मभूमी आंदोलनात सहभाग घेतला होता. त्यामुळे हिंदुत्ववादी संस्कार माझ्यावर देखील झाले. रोहा येथूनच मी कॉमर्समध्ये शिक्षण पूर्ण केले. २००४ मध्ये नितीन पंडित यांच्याशी विवाह झाला.

नितीन हे संघाचे आणि भाजपचे कट्टर कार्यकर्ते. २००२ पासून प्रभागात ते समाजकारण आणि राजकारण करत आहेत. त्यांच्या कामात मी त्यांना सहकार्य करत आहे. घरचा कपड्यांचा व्यवसाय सांभाळून गणपती मंडळामार्फत समाजकार्य करत आहे. महिलांच्या प्रश्नांवर मी काम केले. प्रभागात आम्ही भाजपचे चारही उमेदवार निवडून आलो आहोत. समन्वय ठेवत आता प्रभागातील समस्या सोडवण्यावर मी लक्ष केंद्रित करणार आहे, असे पंडित म्हणाल्या.

**प्रभागात करणार 'ही' कामे**

प्रभागात महिलांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसवणार. प्रामुख्याने तुळशीबाग येथे खरेदीसाठी महिला येत असल्याने या ठिकाणी हे सीसीटीव्ही बसवण्यास प्राधान्य देणार मध्यवस्ती असल्याने व व्यापारी बाजारपेठ असल्याने मोठ्या प्रमाणात या ठिकाणी नागरिक खरेदीसाठी येत असतात. त्यामुळे वाहतूक कोंडी हा प्रश्न गंभीर आहे. तो सोडवण्यावर भर देणार. पार्किंगची समस्या सोंडवण्यावर भर देणार. यासाठी मंडई येथील वाहनतळ आधुनिक व त्याची क्षमतावाढीच्या दृष्टीने प्रयत्न करणार.

# भीमाशंकर मंदिर महाशिवरात्रीला राहणार बंद

नाशिक कुंभमेळा कालावधीत नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे मोठ्या संख्येने भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भेट देण्याची शक्यता आहे. साधारणत: दररोज सुमारे एक लाख भाविक येथे येण्याची शक्यता आहे.

हे लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी श्री क्षेत्र भिमांशकर विकास आराखडा या विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे.या विकास आराखड्याअंतर्गत भाविकांसाठी सुरक्षित, सुयोग्य व सुसज्ज सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध पायाभूत कामे हाती घेण्यात आलेली आहे.

नवीन भव्य सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था, पायरी मार्ग तसेच गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधा विकसित करण्याची कामे सध्या प्रगतिपथावर असून कुंभमेळ्यापूर्वी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**भिमाशंकर मंदिर बंद ठेवण्यामागचे कारण काय?**

कुंभमेळ्याच्या वेळेस भिमाशंकर येथे होणाऱ्या गर्दीचे प्रमाण लक्षात घेता जूना सभामंडपाचे क्षेत्र कमी पडणार असल्यामुळे नवीन भव्य सभामंडपाचे काम हाती घेण्यात आलेले असून त्याबरोबरच पायरी मार्गाचे



काम देखील सुरू करण्यात आलेले आहे. मुख्य सभामंडप पुर्णत उतरविण्यात आल्यामुळे नवीन सभामंडप तयार करताना श्री भिमाशंकर येथे रोज होणारी गर्दी लक्षात घेता मंदीर दर्शनासाठी बंद केल्याशिवाय सदरील काम करणे शक्य होणार नव्हते. इहळारीहरपज्ञरी ढशाश्रिश

कामांचे स्वरूप, परिसरातील भौगोलिक परिस्थिती व भाविकांच्या मोठ्या संख्येचा विचार करता, बांधकाम सुरू असताना मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे हे सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक ठरू शकते. त्यामुळे भाविकांची सुरक्षितता अबाधित राखणे आणि कामे नियोजित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी तात्पुरते बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. भाविकांच्या सोयीचा विचार करून महाशिवरात्री कालावधी (दि. १२ फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ फेब्रुवारी २०२६) वगळण्यात आला होता.

श्री क्षेत्र भीमाशंकर हा अतिवृष्टीचा प्रदेश असून जून ते सप्टेंबर या कालावधीत येथे जास्त पावसाचे प्रमाण असते. या कालावधीत बांधकाम कामे करणे शक्य नसल्याने उपलब्ध कालावधीतच कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. यामुळे विकास कामांना गती देणे अत्यंत गरजेचे आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करून पूर्वी महाशिवरात्री कालावधीत मंदिर खुले ठेवण्याच्या निर्णयामध्ये बदल करण्यात आलेला असून, दि. १२ फेब्रुवारी २०२६ ते दि. १८ फेब्रुवारी २०२६ या महाशिवरात्री कालावधीतही श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर भाविकांच्या नित्यदर्शनासाठी बंद राहणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे जितेंद्र डूडी यांनी स्पष्ट केले आहे.

# तू मला पसंतच नाहीस! लग्नानंतर तिसऱ्याच दिवशी पत्नीचा मोठा गौप्यस्फोट; आठ महिन्यांत लग्न रद्द

पुणे । प्रतिनिधी

थाटामाटात लग्न झाले. त्याने वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मला लग्न मान्यच नाही. तुम्ही (नवरा) पसंतच नाही. आई-वडिलांच्या दबावापोटी लग्न केल्याचे तिने लग्नानंतर तिसऱ्या दिवशी सांगितले. यामुळे त्याच्या पायाखालची वाळूच सरकली. मानसिक धक्क्यातून सावरत त्याने न्यायालयात धाव घेतली. ७ महिने १६ दिवसांच्या संघर्षानंतर दावा निकाली निघाला.

न्यायालयाने लग्न रद्द केले. कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश बी.डी.कदम यांनी हा आदेश दिला.माधव (वय २७) आणि माधवी (वय२४) (नावे बदलली आहेत) अशी दोघांची नावे आहेत. तो व्यावसायिक, तर ती गृहिणी. पारंपारिक पध्दतीने पाहणी करून जून २०२४ मध्ये दोघांचा विवाह झाला. लग्नानंतर नवराच पसंत नसल्याचे सांगत तिने पतीला वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्यास नकार दिला. लग्नाच्या २० दिवसानंतर माहेरी गेली. ती परतलीच नाही. पतीने अ‍ॅड.राहुल जाधव



यांच्यामार्फत मे २०२५ मध्ये न्यायालयात धाव घेतली. मुलीचा विवाह आई-वडिलांच्या मर्जीनुसार झाला आहे. मुलीला मान्य नाही. त्यामुळे तो रद्द करून देण्याची मागणी न्यायालयात केली. त्यानुसार न्यायालयाने लग्न रद्द केले.

**लग्न कसे होते रद्द?**

लग्नावेळी कोणते विधी झाले पाहिजेत, तसेच त्यातील कोणत्या पारंपरिक बाबी पाळल्या पाहिजेत, तसेच, कायदेशीर कोणत्या बाबीची पुर्तता केली पाहिजे. याबाबत हिंदू विवाह कायद्यात काही अटी कलम ५ मध्ये नमूद केल्या आहेत. त्या अटीचे पालन न केल्यास लग्न रद्द करण्यासाठी कलम ११ आणि १२ नुसार अर्ज करता येतो. हा अर्ज लग्न झालेल्या तारखेपासून १ वर्षाच्या आतमध्ये करावा लागतो. अर्ज आल्यानंतर दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकुण न्यायालय निर्णय देत असते.

आई-वडिलांना पाल्याला विश्वासात घेऊनच लग्न जमवावे. जेणेकरून लग्नानंतर वाद, मनस्ताप होणार नाहीत. पती-पत्नी दोघांसह कुटुबियंनाही याचा त्रास होत असतो.

– अ‍ॅड. राहुल जाधव, खजिनदार, द पुणे फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशन